पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १८४ ■ शनिवार, दि. १० जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS
पाहण्यासाठी
QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा




## 'टीईटी'चा १७ जानेवारीपूर्वी निकाल!

**पुणे :** नोव्हेंबरमध्ये झालेल्या शिक्षक पात्रता परीक्षेचा (टीईटी) निकाल १७ जानेवारीपूर्वी जाहीर होणार आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून आता उत्तीर्ण उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची पडताळणी सुरु आहे. राज्यातील जिल्हा परिषदांसह महापालिका, नगरपालिका व खासगी अनुदानित शाळांमधील नऊ हजार शिक्षकांची भरती होणार आहे. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाची संचमान्यता आता अंतिम झाली आहे. त्यात पटसंख्येअभावी अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन होईल. त्यानंतर रिक्त राहिलेली पदे व मे २०२६ पर्यंत सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांची पदे भरली जाणार आहेत. या भरतीत आता 'टीईटी' उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनाही सहभागी होता येणार आहे.

## काँग्रेसच्या माजी केंद्रीय मंत्र्याच्या मुलीसह तीन जणांचा मृत्यू

प्रतिनिधी ९ जानेवारी

**इंदूर :** इंदूरमधील रालामंडल बायपासवर झालेल्या एका दुर्दैवी रस्ते अपघाताने शहराला हादरवून टाकले आहे. माजी खासदार गृहमंत्री बाला बच्चन यांची मुलगी प्रेरणा बच्चन, काँग्रेस प्रवक्ते आनंद कासलीवाल यांचे पुत्र प्रखर कासलीवाल आणि त्यांचा मित्र मान सिमरन संधू यांचा या अपघातात मृत्यू झाला. या अपघातात एक तरुणी गंभीर जखमी झाली असून तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. प्रखर यांचा वाढदिवस साजरा करून हे तिघेही मित्र कॅनडा बायपासवरील कोको फार्मवरून परतत असताना रालामंडलहून विजय नगरला जात असताना त्यांची कार अनियंत्रित झाली. पार्क केलेल्या ट्रकला धडकली. कार चालवणारा काँग्रेस नेत्याचा मुलगा प्रखर याचा जागीच मृत्यू झाला, तर प्रेरणा आणि मन सिमरन यांचा रुग्णालयात मृत्यू झाला. अनुष्का ही आणखी एक तरुणी गंभीर जखमी असून तिच्यावर एमवाय हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

## जीवघेण्या थंडीचा पहिला बळी निफाडमध्ये!

प्रतिनिधी १० जानेवारी

**नाशिक :** तालुक्यात थंडी जीवघेणी ठरत असून, देवगाव (ता. निफाड) येथील २२ वर्षीय तरुणाचा थंडीत काकडून मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी समोर आली आहे.देवगाव येथील पाटबंधारे विभागाच्या कार्यालयाजवळ शुक्रवारी सकाळी आठच्या सुमारास समीर दौलत सोनवणे (वय २२) हा तरुण मृतावस्थेत आढळून आला. पोलिसपाटील सुनील बोचरे यांनी लासलगाव पोलिसांना तत्काळ माहिती दिली. शवविच्छेदनाच्या प्राथमिक अहवालानुसार अतिथंडीमुळे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने तरुणाचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले आहे. वाढत्या थंडीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी विशेषतः रात्रीच्या वेळी काळजी घ्यावी, असे आवाहन वैद्यकीय तज्ज्ञांनी केले आहे

# पुणेकरांना मोफत बस अन् मेट्रो सेवा देणार....





प्रतिनिधी ९ जानेवारी

**पुणे:** पुणे महापालिका राष्ट्रवादी काँग्रेसच्या हाती सुपूर्द केल्यास नागरिकांना बस व मेट्रो सेवेचा मोफत लाभ देण्यात येईल, अशी घोषणा सत्ताधारी राष्ट्रवादीचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी केली. या योजनेमुळे शहर प्रदूषणमुक्त होईल, वाहतूक कोंडी कमी होईल आणि पुणेकरांचे दररोज होणारे कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान वाचेल, असे ते म्हणालेत. सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार यांच्या वतीने शनिवारी अष्टसूत्री प्रगतीचा संयुक्त जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह खासदार सुप्रिया सुळे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार चेतन तुपे, सुनील टिंगरे, दीपक मानकर, सुभाष जगताप, श्रीकांत पाटील, विशाल तांबे, प्रदीप देशमुख आदी दोन्ही पक्षांचे प्रमुख नेते, पदाधिकारी व उमेदवार उपस्थित होते. यावेळी बोलताना अजित पवार म्हणाले, पुण्यात दररोज ३० लाख वाहने रस्त्यावर धावतात. त्यामुळे वाहतूक कोंडीत इंधन आणि वेळेचा अपव्यय होतो. यामुळे पुणेकरांचे दररोज ३० कोटी रुपये, म्हणजेच वर्षाला १० हजार ८०० कोटी रुपये वाया जातात. मोफत बस आणि मेट्रो सेवा दिल्यास दोन्ही कंपन्यांना मिळून वर्षाला केवळ ३०० कोटी रुपये द्यावे लागतील.

### महिलांना ५ लाखांपर्यंतचे बिनव्याजी कर्ज

शहरातील गंभीर वाहतूक समस्या सोडवण्यासाठी खड्डेमुक्त रस्त्यांचे नियोजन आहे. स्वच्छ सर्वेक्षणामध्ये पुणे शहराला देशात आघाडीवर आणण्यासाठी प्रयत्न केले जातील. सोसायट्यांना स्वच्छतेबाबत २० टक्के सवलत देण्याचा प्रस्ताव आहे. नागरिकांना हायटेक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच, कॉर्पोरेशन शाळेतील विद्यार्थ्यांना टॅबलेट दिले जातील. एवढेच नव्हे तर पालिकेचे मोफत कौशल्य प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या महिलांना पाच लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज देण्याचे वचनही अजित पवार यांनी दिले आहे. प्रस्तुत जाहीरनामा पुढील ५ वर्षांसाठी आहे. आम्ही आळशी नसून, पहाटे ६ वाजेपासून रात्री उशिरापर्यंत काम करणारी माणसे आहोत. पुण्याची दिशा बदलणारा हा जाहीरनामा आहे, असेही अजित पवार यावेळी म्हणाले.

### वैद्यकीय सुविधा

पुणे महानगरपालिका क्षेत्रात २०० 'राजमाता जिजाऊ क्लिनिक' (अद्ययावत प्राथमिक आरोग्य केंद्र) उभारली जातील. येथे तपासणी, आरोग्य सेवा आणि महत्त्वाची औषधे मोफत मिळतील. यामुळे मोठ्या रुग्णालयांवरील ताण कमी होईल. वरील सर्व आरोग्य केंद्रांच्या परिसरात दरमहा विशेष शिबिरे आयोजित केली जातील. याद्वारे नवविवाहित महिलांना सीझर टाळण्याचे उपाय, आरोग्य आणि सुरक्षित बाळंतपणाबाबत मार्गदर्शन केले जाईल. आई आणि बाळाचे आरोग्य जपण्यासाठी वेळेवर समुपदेशन आणि वैद्यकीय सल्ला दिला जाईल. सध्या पीएमसीद्वारे चालविण्यात येणाऱ्या रुग्णालयांमध्ये मंजूर असलेल्या सुमारे ९४० बेडपैकी केवळ ४२५ बेड उपलब्ध आहेत. ही कमतरता भरून काढण्यासाठी विद्यमान रुग्णालयांचे अद्ययावतीकरण केले जाईल. तसेच नवीन रुग्णालयांची उभारणी करून एकूण बेडची वाढवली जाईल.

## इम्रान प्रतापगडी यांना अकोलेकरांचा अपमान करण्याचा अधिकार नाही : विजय अग्रवाल



प्रतिनिधी १० जानेवारी

**अकोला:** बाहेरून येऊन अकोलेकरांचा अपमान करण्याचा खासदार इमरान प्रतापगडी यांना अधिकार नाही. अकोलेकर मतदारांनी काँग्रेसला धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही असा संकल्प केलेला दिसत आहे. अकोलेकरांची इंग्रजांसोबत तुलना करण्याचे महापाप खासदार इमरान प्रतापगडी यांनी करून संविधानाचा सुद्धा अपमान केला आहे. याबद्दल त्यांनी जाहीर माफी मागावी अशी मागणी भाजपा नेते विजय अग्रवाल यांनी केली.

अकोल्यात येऊन अकोलेकरांना शहाणपणा शिकवण्याचे पाप कोणी करू नये. अकोला महानगरपालिकेची टॅक्स संदर्भात सुप्रीम कोर्टाचा निकाल आल्यावर सुद्धा त्याच्यावर टीका टिपणी आणि दिशाभूल करून अराजकता निर्माण करण्याचा प्रयत्न कोणी करू नये असा इशारा भाजपा निवडणूक प्रमुख विजय अग्रवाल यांनी दिला आहे.

राजराजेश्वर नगरीची संस्कृती, परंपरा, वैभव यावर कोणी प्रश्नचिन्ह निर्माण करू नये. अकोलेकर भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी युतीला विजयी करतील असा विश्वास विजय अग्रवाल यांनी व्यक्त केला.

## अकोल्यात आज शिवसेनेच्या प्रचार कार्यालयाचे दिमाखात उद्घाटन

प्रतिनिधी १० जानेवारी



**अकोला:** आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (शिंदे गट) पक्षाने आपली कंबर कसली असून, आज १० जानेवारी रोजी खोलेश्वर रजपूत पुरा भागात भव्य प्रचार कार्यालयाचे उद्घाटन होणार आहे. या कार्यक्रमाला शिवसेना उपनेते गोपीकिशन बाजोरिया आणि माजी आमदार शशिकांत खेडेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.या कार्यालयातून उमेदवार उषाताई विर्क, शीतल अग्रवाल, राजू बगथरिया आणि गौतम कंकाळ यांच्या प्रचाराची धुरा सांभाळली जाईल. या कार्यक्रमाला जिल्हाप्रमुख श्रीरंग पिंजरकर, नारायणराव गव्हाणकर आणि चंद्रशेखर पांडे गुरुजी यांची देखील उपस्थिती राहणार असून, शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर अंतराळवीर आजारी

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर गेल्या २५ वर्षांत जे घडले नाही, ते आता घडणार आहे. एका अंतराळवीराची प्रकृती बिघडल्याने 'नासा'ने संपूर्ण 'क्रू-११' टीमला नियोजित वेळेपूर्वीच तातडीने पृथ्वीवर परत बोलावण्याचा निर्णय घेतला आहे. अंतराळात उपचारांच्या मर्यादित सुविधा पाहता नासाने हा मोठा धोका पत्करण्यास नकार दिला आहे.

## बिबट्याने चिमुकल्याचा बळी; खडकी-डोंगरगाव येथील घटना

प्रतिनिधी १० जानेवारी

**गोंदिया :** घराच्या मागील अंगणात चुलीजवळ बसून असलेल्या चार वर्षीय चिमुकल्याला अचानकच झडप घालून बिबट्याने उचलून नेले. तिरोडा तालुक्यातील ग्राम खडकी-डोंगरगाव येथे शुक्रवारी (दि.९) सकाळी ७:३० वाजताच्या सुमारास हा प्रकार घडला. या घटनेनंतर कुटुंबीयांनी बिबट्याचा शोध घेतला असता चिमुकल्याचा मृतदेह मिळाला. या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला असून गावकऱ्यांत संतापाचे वातावरण आहे. या घटनेत मृत्युमुखी पडलेल्या चिमुकल्याचे नाव हियांश शिवशंकर रहांगडाले असे आहे.मिळालेल्या माहितीनुसार, हियांशला त्याची आई घराच्या मागील अंगणात चुलीजवळ बसून मुरमुऱ्याचा लाडू खाऊ घालत होती. त्याच वेळी दवा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक हल्ला करीत हियांशला उचलून नेले. पालकांनी आरडाओरड करत बिबट्याचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. मात्र काही वेळाने हियांशचा मृतदेह आढळून आला. या घटनेनंतर गावात प्रचंड संतापाची लाट उसळली असून वनविभागाबाबत रोष व्यक्त केला जात आहे.

## 'बोइंग 777' ची देखभाल आता नागपुरात!

प्रतिनिधी १० जानेवारी

**नागपूर :** मिहानमधील एआय इंजिनीअरिंग सर्व्हिसेस लिमिटेडच्या (पूर्वीचे नाव एअर इंडिया इंजिनीअरिंग सर्व्हिसेस) एमआरओला फेडरल एव्हिएशन ?डमिनिस्ट्रेशन अर्थात एफएएने मान्यता दिली आहे. त्यामुळे या एमआरओमध्ये आता 'बोइंग ७७७'ची संपूर्ण देखभाल-दुरुस्ती शक्य होणार आहे.

मिहानच्या आर्थिक विशेष क्षेत्रामध्ये (सेझ) सुमारे ५० एकर जागेवर एआयईएसएलचे एमआरओ आहे. येथे एअर इंडियाच्या विमानांची देखभाल-दुरुस्ती होते. याशिवाय, वर्षभरापासून येथे कुवेत एअरलाइन्सच्या विमानांची देखभाल-दुरुस्ती करण्यात येत आहे. अशात या एमआरओला एफएएने बोइंग ७७७ च्या डी-चेकसाठी मान्यता दिली आहे. त्यामुळे बोइंग ७७७ विमानाची संपूर्ण उकल करणे (डीअसेम्बलिंग) तसेच धड, पंख, लँडिंग गिअर, संरचना यांची सखोल तपासणी आणि मोठ्या स्वरूपातील दुरुस्ती शक्य होणार आहे. ही तपासणी साधारणतः सहा ते १० वर्षांतून एकदा केली जाते. विमान वाहतूक क्षेत्राचा विचार करता ही अत्यंत खर्चिक व वेळखाऊ अशा स्वरूपाची देखभाल असते. आंतरराष्ट्रीय स्तरावरील ही सुविधा मिहानमध्ये उपलब्ध होणे नागपूरच्या दृष्टीने मोठी उपलब्धी मानल्या जात आहे. अमेरिकेच्या एफएएकडून मिळणारी मान्यता ही विमान देखभालीच्या क्षेत्रातील सर्वात कठोर व विश्वासार्ह मानकांपैकी एक मानली जाते.

एफएएच्या मान्यतेमुळे एआयईएसएलचे मिहान येथील एमआरओ 'डी-चेक' म्हणजेच विमान देखभालीच्या सर्वात व्यापक व गुंतागुंतीच्या टप्प्याचे काम करण्यास सक्षम झाले आहे. यासोबतच ४ हजार दिवस, ३६ हजार तास उड्डाण आणि १८ हजार फ्लाइट सायकल्सपर्यंतच्या विमानांना सपोर्ट देण्याची पूर्ण क्षमता या केंद्रात निर्माण झाली आहे. त्यामुळे बोईंग ७७७ विमानांच्या संपूर्ण आयुष्यकालातील देखभाल सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे.

## मुख्यमंत्री ममता बॅनर्जी थेट पोहोचल्या हायकोर्टात!

वृत्तसंस्था १० जानेवारी



**नवी दिल्ली :** अमित शाहांना दिले आव्हान; ईडीविरुद्ध दोन एफआयआर दाखल कोलकाता : पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसच्या आयटी सेल प्रमुखांच्या घरावर ईडीच्या छाप्यांविरोधात तृणमूल काँग्रेस दिल्ली ते कोलकाता हल्लाबोल केला. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी ईडीविरुद्ध दोन एफआयआर दाखल केले आहेत आणि कोलकातामध्ये मोर्चाचे नेतृत्वही केले. ममता बॅनर्जी यांनी गृहमंत्री अमित शाह यांच्याविरुद्ध पेन ड्राइव्ह असल्याचा दावा केला. 'कोळसा घोटाळ्याचे पैसे दिल्लीतील वरिष्ठ भाजप नेत्यांपर्यंत पोहोचतात. माझ्याकडे याचे पुरावे आहेत. गरज पडल्यास मी ते जनतेसमोर सादर करू शकते.'

## सर्वच पक्षांना मतविभाजनाचे 'हर्डल्स' करावे लागेल पार! एकीकडे हिंदुत्वाचे मत विभाजन तर दुसरीकडे व्होट बँकेचे!

प्रतिनिधी १० जानेवारी

**अकोला :** अकोला महानगरपालिकेचा प्रचार शिगेला पोहोचला असून, सर्वच पक्षांना मतविभाजनाची चिंता लागली आहे. कारण हिंदुत्वाचा मुद्दा घेऊन तीनही पक्ष एकमेकांविरूद्ध उभे ठाकले असल्याने मत विभाजन अटळ आहे. तसेच काही पक्षांची खास व्होट बँक असलेले पक्षांनीही एकमेकांसमोर शड्डू ठोकला आहे. त्यामुळे मतविभाजनचे हे 'हर्डल्स' लीलया पार करणाराचा यशस्वी होणार आहे. आगामी काळात हे मतविभाजन कोणाच्या पथ्यावर पडणार आहे आणि कोणाचा पत्ता कट करणार आहे, हे समजणार आहे.

अकोला महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपा, शिंदेसेना, उद्धवसेना ही तीनही मुख्य पक्ष एकमेकांविरोधात उभे असल्याने आणि या तीनही पक्षांचा 'हिंदुत्व' हा प्रचाराचा प्रमुख मुद्दा असल्याने मतांचे विभाजन होणे अटळ आहे. याचा फायदा विरोधकांना विनासायस मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. तर दुसरीकडे काँग्रेसची खास व्होट बँक असलेल्या ठिकाणीच एमआयएमने आपले उमेदवार दिल्याने एकप्रकारे त्यांनी काँग्रेससमोर कडवे आव्हानच उभे केले आहे. या दोन्ही पक्षाच्या लढाईत मतविभाजन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या व्यतिरिक्त राष्ट्रवादीचा अजित पवार गट भाजपासोबत तर शरद पवार गट काँग्रेससोबत आहे. तर वंचितने आपला 'एकला चलो रे'चा हेका कायम ठेवला आहे. त्यामुळे ही निवडणूक अतिशय चुरशी व रंजक ठरणार आहे. या व्यतिरिक्त जातीपातीचे राजकारण ही मत विभाजनाला हातभार लावणार असल्याने पक्षांच्या उमेदवारांसमोर नवे आव्हान उभे राहिले असून, ते कोणते समीकरण जुळवून यातून मार्ग काढणार आहेत, याकडे सर्वांच्या नजरा लागलेल्या आहेत.




### मविआतील वरिष्ठ नेत्यांची उदासीनता नडणार!

महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात येत असतानाही अद्याप महाविकास आघाडीतील वरिष्ठ पातळीवरील एकाही नेत्याने अकोल्यात प्रवेश केला नाही. त्यांची ही उदासीनता पक्षाला फटका बसण्यास कारणीभूत ठरू शकते. कारण भाजपाच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची विजय संकल्प सभा पार पडली. तर शिंदे सेनेच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचीही सभा नुकतीच पार पडली. दुसरीकडे 'एआयएमआयएम'चे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार ओवेसी यांच्या मुस्लीमबहुल भागातील सभेनंतर राजकीय वातावरण तापले आहे. या तीन्ही नेत्यांच्या सभांमुळे उमेदवार व मतदारांमध्ये ऊर्जा निर्माण करण्याचे कार्य केले. मात्र माविआतील एकाही वरिष्ठ नेत्याने हजेरी न लावल्याने या निवडणुकीच्या शिवसेना ठाकरे गट, काँग्रेस व दोन्ही राष्ट्रवादी प्रचारात माघारल्याचे दिसून येते. याला कारणीभूत वरिष्ठांची उदासीनता ठरत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगत आहे.

सर्वच पक्षांनी मतविभाजनाचा धसका घेतला असून, ते कसे टाळता येईल, याकडे लक्ष दिले असले तरी हे प्रयत्न कितपत फळास येतात, हे महत्त्वाचे ठरणार आहे.




CMYK CMYK

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
शनिवार, दि.१० जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# मतदान जनजागृतीसाठी निमा अमरावतीचा भक्कम पुढाकार

## ५० टक्के सवलत उपक्रमाबाबत निवडणूक अधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी १० जानेवारी

**अमरावती :** लोकशाही अधिक सक्षम व सुदृढ करण्याच्या उद्देशाने Nationaled Integrated Micaled Asociation (NIMA), अमरावती यांच्या वतीने मतदान जनजागृतीसाठी राबविण्यात येणाऱ्या अभिनव उपक्रमाबाबत आज माननीय निवडणूक अधिकारी, महानगरपालिका अमरावती यांना अधिकृत निवेदन सादर करण्यात आले. हे निवेदन NIMA अमरावतीचे कार्याध्यक्ष डॉ. उज्वल वारंगे यांच्या मार्फत देण्यात आले.



या उपक्रमाअंतर्गत मतदान केल्यानंतर मतदाराच्या बोटावर लावलेली शाई (मतदानाची निशाणी) दाखविल्यास सहभागी डॉक्टरांकडील वैद्यकीय सल्ला शुल्कात ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे. मतदानाच्या दिवशी नागरिकांचा सहभाग वाढावा, लोकशाही प्रक्रियेला चालना मिळावी तसेच मतदानाबाबत जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून अमरावती शहरातील जास्तीत जास्त मतदारांनी आपल्या मतदानाच्या हक्काचा वापर करावा, असे ऱ्र्ईं अमरावती यांच्या वतीने यावेळी नम्र आवाहन करण्यात आले. लोकशाही बळकट करण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत आवश्यक असून, वैद्यकीय क्षेत्राने सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवत पुढाकार घेणे काळाची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.ष्सदर उपक्रम पूर्णतः निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार व कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध न ठेवता, केवळ सामाजिक जनजागृतीच्या भावनेतून राबविण्यात येत असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. यावेळी कार्याध्यक्ष डॉ. उज्वल वारंगे, उपाध्यक्षा डॉ. प्रिया चौधरी, आयुर्वेद फोरमचे राज्याध्यक्ष डॉ. अमोल ढवळी, डॉ. विजय खंडारे, डॉ. परिस उंडे आदी उपस्थित होते.अशी माहिती डॉ प्रवीण औगड अध्यक्ष अमरावती यांनी दिली.

# बेलपुरा जाहीर सभेत आ. रवि राणा यांचे पाना चिन्हावरील उमेदवारांना निवडून आणण्याचे आवाहन

## युवा स्वाभिमान पार्टीचे उमेदवार जनतेच्या विश्वासावर खरे उतरणारे-आ. रवि राणा

प्रतिनिधी १० जानेवारी

**अमरावती:** अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्र. १२ स्वामी विवेकानंद-बेलपुरा येथे युवा स्वाभिमान पार्टीच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ बेलपुरा परिसरात भव्य जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत युवा स्वाभिमान पार्टीचे संस्थापक अध्यक्ष तथा आमदार रवि राणा यांनी उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन करत पाना या निवडणूक चिन्हावरील उमेदवारांना प्रचंड बहुमताने निवडून आणण्याचे आवाहन केले.



या वेळी आ. रवि राणा यांनी संजय भगवान माहुरकर (बटन क्र. ११), प्रिती हर्षल रेवणे (बनारसे) (बटन क्र. ०६), अर्चना गणेश तालन (बटन क्र. ०६) व निखिल उर्फ छोटू आकोटकर (बटन क्र. ०८) या उमेदवारांचा विशेष उल्लेख करत हे उमेदवार जनतेच्या सेवेत समर्पित, अभ्यासू व कार्यक्षम असल्याचा विश्वास व्यक्त केला.

३० वर्षांपूर्वीच्या जिर्ण घरांचा प्रश्न सोडवणार आ. रवि राणा म्हणाले की, बेलपुरा परिसरातील अनेक कुटुंबे आजही ३० वर्षांपूर्वी इंदिरा आवास योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या जिर्ण व धोकादायक घरांमध्ये राहत आहेत. ही घरे नागरिकांच्या जीवाला धोका ठरत असून, या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत नवीन, सुरक्षित व दर्जेदार घरे बांधून देण्यात येतील, अशी ठाम ग्वाही त्यांनी दिली. डोक्यावर सुरक्षित छप्पर मिळणे हा प्रत्येक कुटुंबाचा मूलभूत हक्क असून तो पूर्ण करण्यासाठी युवा स्वाभिमान पार्टी कटिबद्ध आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सर्वांगीण विकासाचा ठोस आराखडा युवा स्वाभिमान पार्टीने या प्रभागासाठी युवा, सुशिक्षित, अभ्यासू व कार्यक्षम उमेदवार दिले असून, त्यांच्या माध्यमातून प्रभागाचा नविन्यपूर्ण व सर्वांगीण विकास साधला जाईल, असे आ. राणा यांनी सांगितले.

पायाभूत सुविधा, दर्जेदार रस्ते, नाली-निचरा व्यवस्था, नियमित पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य सुविधा, शिक्षण व्यवस्था तसेच महिला व युवकांसाठी विशेष योजना राबविण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

**'युवा उमेदवार म्हणजे नवी दिशा' – नागरिकांचा विश्वास**

या जाहीर सभेदरम्यान उपस्थित नागरिकांनी हात वर करून युवा स्वाभिमान पार्टीच्या उमेदवारांना निवडून आणण्याचा निर्धार व्यक्त केला. युवा उमेदवार म्हणजे नवा विचार, नवी ऊर्जा आणि नव्या विकासाची दिशा असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले.

सभेत युवकांचा मोठा उत्साह दिसून आला, तसेच महिलांची लक्षणीय उपस्थिती ही या जाहीर सभेचे विशेष आकर्षण ठरली.

**आश्वासनांऐवजी काम करणारे प्रतिनिधी निवडा**

आ. रवि राणा पुढे म्हणाले की, आतापर्यंत प्रभागात केवळ आश्वासनांची राजकारणे झाली, मात्र आता प्रत्यक्ष काम करणारे, जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून लढणारे प्रतिनिधी निवडण्याची वेळ आली आहे.


युवा स्वाभिमान पार्टी सत्तेसाठी नव्हे, तर विकासासाठी राजकारण करत असून प्रत्येक नागरिकाचा सन्मान राखत प्रभागाचा कायापालट केला जाईल, असा विश्वास त्यांनी दिला.

# गुरुकुल बीएससी नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. बालासुब्रमणी नचिमुथू यांचा जागीच मृत्यू

## ♦ अनियंत्रित वाहतूक कोंडीमुळे अपूर्ण रस्ता ठरतोय मृत्यूचा सापळा; दर्यापूर अकोट रोडवरील घटना

प्रतिनिधी १० जानेवारी

**दर्यापूर:** दर्यापूर अकोट मार्गावरील माहेश्वरी भवन परिसरात झालेल्या भीषण अपघातात प्राचार्य डॉ. बालासुब्रमणी नचिमुथू (रा. तामिळनाडू) यांचा दुर्दैवी आज सकाळी ११.३० मृत्यू झाला. ते गुरुकुल बीएससी नर्सिंग कॉलेज, शिवर रोड, दर्यापूर येथे प्राचार्य म्हणून कार्यरत होते. या अपघातामुळे शैक्षणिक क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, प्रा. डॉ. नचिमुथू हे आपल्या दुचाकी (बुलेट) क्रमांक टीएन ३८ सीपी ५३१६ ने काही कामानिमित्त दर्यापूर-अकोट मार्गावरून जात होते. दरम्यान माहेश्वरी भवनाजवळ त्यांच्या दुचाकीचा अपघात झाला ट्रक क्रमांक एमएच ४९ बिझेड १२२५ च्या मागील भागाला जोरदार धडक बसली. अपघात इतका भीषण होता की त्यांचा जागीच मृत्यू झाला. सदर मार्गावर नेहमीच मोठ्या प्रमाणात वाहतुकीची वर्दळ असते. यापूर्वीही या ठिकाणी अनेक अपघात घडले असून, तरीदेखील वाहतूक नियंत्रणाबाबत ठोस उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे पोलीस प्रशासन व संबंधित यंत्रणांनी या मार्गावरील वाहतूक व्यवस्थे मध्ये तातडीने लक्ष देण्याची गरज असल्याची मागणी नागरिकांतून होत आहे. या दुर्दैवी घटनेमुळे गुरुकुल बीएससी नर्सिंग कॉलेजमधील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी तसेच शैक्षणिक वर्तुळात शोककळा पसरली असून, सर्व स्तरांतून प्राचार्य डॉ. बालसुब्रमण्यम नचिमुथू यांना पाहण्यासाठी रुग्णालयात एकच गोंधळ उडाला होता.

दर्यापूर अकोट हा महामार्ग आधीपासूनच अपघात ग्रस्त रस्ता म्हणून ओळखला जातो कारण यापूर्वीही याच ठिकाणी अनेक अपघात झाले आहे मात्र वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून ठोस उपाययोजना केल्या जात नसल्याने नागरिकांचा जीव धोक्यात येत असल्याचा आरोप नागरिकांनी केला.

# आरोपीची निर्दोष सुटका

प्रतिनिधी १० जानेवारी

**अमरावती :** राष्ट्रीय पक्षी मोर वा इतर २६ अनुसूची १ पार्ट अनुक्रम १० सी पक्षना विष देवून मारल्याबद्दल पोहरा वनविभाग अमरावती अंतर्गत वडाली वनपरिक्षेत्र येथिल वन अधिकारी यानी दखल केल्याला गुन्हा अंतर्गत आरोपी सुभाष कनीराम जाधव यांची निर्दोष सुटका ऐड सपना जाधव यांची सफ़ल पैरवी केली. वनविभाग अमरावती अंतर्गत वडाळी वनपरिक्षेत्रात पोहरा या वर्तुळातील वनक्षेत्रात वाघ, विवट, रोही, मोर, खवल्या मांजर, ससा, घोरपड, भोरी इ. पर्यावरणीय दृष्टीने अत्यंत महत्वाचे पशु व पक्षी यांचे वास्तव्य आहेत. दिनांक १७/०४/२०१५ रोजी मिळालेल्या माहितीवरुन पोहरा प्रतक्षेत्रात पोहरा वर्तुळात माणुस टांगी नाल्याजवळ मोरांची शिकार पाण्यामध्ये विष टाकुन केल्याची दर्शनास आले. त्यावेळी घटनास्थळी मोर ०३, बुलबुल पक्षी २६, मुनीया ०४ आणि शिखरा ०१ नग मृत अवस्थेत आढळले. सदर घटनेची चौकशी व तपास करणे करीता रात्रीचे वेळी जंगलामध्ये गस्त सुरु केली. दि. १८/०४/२०१५ रोजी रात्री १०.०० चे दरम्यान पोहरा तलावाचे भागामध्ये वनरक्षक श्री. एस.एस. खराबे वनपाल एम. व्हि. धन्दर व इतर ०२ वनमजुर हे मिळालेल्या माहिती वरुन वनामध्ये उंच क्षेत्रात दबा धरुन बसले. रात्री १०.०० चे दरम्यान एक उजेड (टॉर्च) पोहरा तांडा भागातुन जंगलाकडे जातांना दिसुन आला. तो उजेड एका ठिकाणी स्थिर झाला. वनकर्मचा-यांनी हळूहळू अंधारामध्ये उजेडाच्या जवळ पोहचले. त्या ठिकाणी दोन व्यक्ती शिकारी काहीतरी करतांना दिसले, सर्वांनी झड्प घालुन दोन शिकारापैकी एक शिकारी पकडला. त्यावेळी त्यानी मी ससांची शिकार करण्याकरीता आलो आहे असे सांगितले. व माझे नाव सुभाष कनीराम जाधव त्याला पोहरा गावाकडे आणत असता तो हाताला झटका मारुन अंधारामध्ये पळुन गेला.

# वीर वैभव लहाने यांच्या वर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

प्रतिनिधी १० जानेवारी

**अकोला :** देशसेवेत कर्तव्य बजावत असताना अकोला जिल्ह्यातील सेवारत सैनिक नायक वैभव श्रीकृष्ण लहाने यांना वीरमरण आले. ते १२ मराठा लाइट इन्फंट्री या युनिटमध्ये कार्यरत होते. त्यांच्या मूळ गावी कपिलेश्वर येथे सैनिकी व शासकीय इतमामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. शहिद लहाने हे जम्मू काश्मिरमध्ये कुपवाडा सेक्टरमध्ये कार्यरत होते.



प्रशासनाच्या वतीने तहसीलदार कुणाल झाल्टे, मराठा लाईट इन्फ्रंट्रीचे सीएचएम रामेश्वर पाटील, वैभव लहाने यांच्या कुटुंबियांनी पुष्पचक्र अर्पण केले. यावेळी सैनिकी विभागाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. पोलीस विभागाच्या वतीने बंदुकीच्या तीन फैरी झाडून सलामी देण्यात आली. यावेळी मोठ्या प्रमाणात जनसमुदाय उपस्थित होता.

# डॉ. नरेन्द्र भिवापुरकर अंध विद्यालय व आश्रित अंध कर्मशाळा

प्रतिनिधी १० जानेवारी

**अमरावती:** येथे ब्रेल लिपीचे जनक लुई ब्रेल यांच्या जयंती निमित्य दिनांक ०४/०१/२०२६ ते दिनांक ०६/०१/२०२६ या काळात वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आलेले होते. या ३ दिवसात अंध विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा, नाटीका, नृत्य, एकांकिका, इत्यादी कार्यक्रम साजरे करण्यात आले. दिनांक ०६/०१/२०२६ रोजी समारोपीय कार्यक्रम ठीक ४.०० वाजता घेण्यात आला या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणुन श्रीमती आशाताई देशमुख, प्रमुख पाहुणे म्हणुन सुप्रसिध्द समाजसेवक डॉ.



गोविंदभाउ कासट, दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयाचे सहाय्यक सल्लागार श्री.पी.डी शिंदे, संस्थेचे सल्लागार श्री. रतन कांबळे आश्रित अंध कर्मशाळेचे व्यवस्थापकीय अधिक्षक. पंकज गो. मुदगल इत्यादी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारीतोषिक वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन . प्रशांत राजाभाउ गाडगे यांनी केले तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक नवनाथ इंगोले यांनी केले कार्यक्रमाला शाळचे शिक्षक कर्मचारी व माजी विद्यार्थी उपस्थित होते.

# गोरक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारा श्री. पंचकृष्ण गोरक्षणाचा भक्तीपर कार्यक्रम

प्रतिनिधी १० जानेवारी

**अमरावती :** श्री. पंचकृष्ण गोरक्षण आणि धर्मादाय ट्रस्ट, चिंचखेड यांनी आयोजित केलेला श्री पंचावतार उपहार महोत्सव आणि अभिषेकम समारंभ मोठ्या भक्ती आणि उत्साहात संपन्न झाला. संपूर्ण कार्यक्रम भक्तीपूर्ण वातावरणाने भरून गेला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान परमपूज्य बिडकर बाबा होते, तर अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे अध्यक्ष परमपूज्य करंजकर बाबा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. परमपूज्य पुसदेकर बाबा यांचीही उपस्थिती होती. सामाजिक कार्यकर्ते चंद्रकुमार उर्फ ??लप्पीभैय्या जाजोदिया यांच्यासह सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन परमपूज्य करंजकर बाबा यांनी केले आणि मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवरांनी अभिषेक, सत्कार आणि धार्मिक विधी केले. संत आणि महंतांनी त्यांच्या प्रवचनाद्वारे चांगले आचरण, गोरक्षण, सेवा आणि भक्तीचे महत्त्व अधोरेखित केले. पंचावतार उपहार महोत्सवात मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले होते. कार्यक्रम विशेष उत्साही होता.



कार्यक्रमाच्या शेवटी, अखिल भारतीय महानुभाव पंथाचे अध्यक्ष करंजकर महाराज यांनी उपस्थित सर्व भाविकांचे आणि आयोजकांचे आभार मानले. त्यांनी समाजसेवेत सक्रियपणे सहभागी असलेले लप्पीभैय्या म्हणून ओळखले जाणारे चंद्रकुमार जाजोदिया यांना आशीर्वाद दिला आणि गायींची सेवा सुरू राहावी अशी शुभेच्छा दिल्या.

**समाजाशी सतत संबंध राखण्याची प्रतिज्ञा**

अमरावती येथील लोकप्रिय सामाजिक कार्यकर्ते लप्पीभैय्या यांनीही आपल्या भाषणात सर्वांचे आभार मानले आणि समाजाशी सतत संबंध राखण्याची प्रतिज्ञा केली. गोरक्षण न्यासाचे अध्यक्ष शंतनू इंगोले यांनी सर्व विश्वस्त, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांसह कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन सुनिश्चित करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी संदीप जुनघरे, अमोल ठाकरे, सचिन गावंडे, अभिजीत काळबांडे, वैभव मोंढे, हर्षद अडसोड, निखिल बुरघाटे, ऋषिकेश चांगोले, प्रणव धसकत, अक्षय इंगोले, अमोल इंगोले, प्रणव धसकत यांच्यासह सर्व मान्यवरांचे व भाविकांचे आयोजकांनी आभार व्यक्त केले.

# आमदार रणधीर सावरकर यांची पदयात्रा, प्रचार सभांना उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी १० जानेवारी

**अकोला:** अकोला महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाचे स्टार प्रचारक पक्षाचे सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर यांनी अकोला शहरातील विविध प्रभागामध्ये संपर्क करून तीन लाख ४३२ मतदारांशी वेगवेगळ्या पद्धतीने संवाद साधला आहे.

भ्रमणध्वनी इलेक्ट्रॉनिक मीडिया तसेच थेट संपर्क संवाद सभा, या माध्यमातून त्यांनी संपर्क करून भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रवादी काँग्रेस युतीला विजयी करण्याचा आव्हान केला आहे. सकारात्मक आणि सर्व स्पर्शी विकास आणि अकोलेकरांच्या सुखदुःखात सहभागी होण्याची संकल्पना इच्छाशक्ती तसेच अकोलेकर हे आमचे आहे अकोलेकर हे मालक आहेत अकोले करांची आम्ही सेवक आहे अकोलेकरांच्या समस्या निर्माण करण्याचा साठी अकोले करांनी दिलेली जबाबदारी पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत आणि त्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून निधी उपलब्ध करून देण्याची हमी इच्छाशक्ती आणि शहराचा सर्वांगीण विकास हेच लक्ष घेऊन जात-पाच धर्म पेक्षा अकोलेकर अकोल्याचा विकास अकोलेकरांच्या सुविधा उपलब्ध करून देणे हीच जबाबदारी घेऊन अकोला गतिशील विकसित करण्याचा संकल्प हाच प्रचाराचा मुद्दा घेऊन राजेश्वर मंदिरासह राजेश्वर नगरीचा विकास करून ५११ ची नवीन एमआयडीसी करण्याचा



संकल्प करून रोजगार ची संधी देण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे उमेदवारांना विजयी करा असे आव्हान त्यांनी केले.

व्यापारी डॉक्टर्स इंजिनियर बिल्डर्स सर्वसामान्य नागरिक शेतकरी कामगार फेरीवाले, मातृ शक्ती वेगवेगळ्या सामाजिक संघटना यांच्याशी संपर्क करून धार्मिक आणि राजकीय शैक्षणिक संस्थांच्या संचालकांशी संवाद साधून भारतीय जनता पक्षासाठी मताचा जोगावा आमदार रणधीर सावरकर रणधीर सावरकर यांनी मागितला.

सतत १८ तास जनतेशी संपर्क राहणारा नेता निवडणुकी काळात सुद्धा सातत्याने उपलब्ध राहून व्यक्तिगत समस्यासह नागरी समस्या सोडवण्यासाठी आजही कार्यरत आहे ग्रामीण आणि शहरी भागाचा विकास समतोल विकास व्हावा या दृष्टीने आमदार रणधीर सावरकर शहराच्या प्रत्येक भागामध्ये नागरिकांशी संवाद साधत आहे भारतीय जनता पक्षाचे ६२ उमेदवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे १४ उमेदवार यांच्या प्रचारार्थ वेगवेगळ्या माध्यमातून त्यांनी संवाद साधला आहे

**कार्यालय नगरपरिषद कारंजा (लाड)**

**ई- निविदा सुचन**

**ई- निविदा सुचना क्र. ६३८६/२०२५ दिनांक ०८.०१.२०२६**

नगर परिषद कारंजा लाडच्यावतीने मुख्याधिकारी यांच्या आदेशान्वये नगर परिषद कारंजाच्या स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत प्राप्त निधी मधून सार्वजनिक शौचालय बांधकाम करण्याबाबत कामे करण्याकरिता महाराष्ट्र शासनाकडील नोंदणी कृत परवानाधारक, कंत्राटदार यांच्याकडून संबंधीत कामाकरिता ई- निविदा पद्धतीने ई- निविदा मागविण्यात येत आहे. निविदेचे अटी व शर्ती, निविदेची विस्तृत माहिती आणि कामाचा सविस्तर तपशील व नमुना शासनाच्या www.mahatender.gov.com.in या वेबसाईटवर दि. ०९/०१/२०२६ पासुन पाहण्यास उपलब्ध आहे.

**(महेश वाघमोडे)**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद कारंजा लाड**

**बुलडाणा जिल्हा परिषद, बुलडाणा**

**(बांधकाम विभाग)**

**निविदा सुचना क्रमांक पहिली वेळ १५/२०२५-२६**

जिल्हा परिषद, बुलडाणाचे वतीने बांधकाम विभाग जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेतर्फे कामाची निविदा सुचना / फेर निविदा/शुध्दीपत्रके व माहिती जि. प. चे www.zpbuldhana.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

महाराष्ट्र शासनाअंतर्गत जिल्हा परिषदेकडील योग्य त्या वर्गातील वैध नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब-१ करारनाम्यावरील कामाचे निविदा मागविण्यात आल्या असुन हया कामाबाबतची सविस्तर निविदा सुचना/माहिती/अटी व शर्ती ईत्यादी जि.प.चे वरील संकेत स्थळावर व बांधकाम विभाग, जि.प. बुलडाणा येथे कार्यालयीन नोटीस बोर्डवर दिनांकः ६./..१..../२०२६ वाजेपासुन प्रसिध्द करण्यात आले आहे. या निविदा सुचना प्रकरणी पुढील फेरनिविदा/ शुध्दीपत्रके व माहिती ही (६.१.२०२६).

उपरोक्त संकेत स्थळावरच प्रसिद्धीस देण्यात येईल.

**कार्यकारी अभियंता**
**बांधकाम विभाग, जि.प. बुलडाणा**

**अति. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, बुलडाणा**

सिटी न्यूज अकोला
शनिवार, दि. १० जानेवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# हरभऱ्यावरील घाटेअळीचे एकात्मिक व्यवस्थापन

प्रतिनिधी १० जानेवारी

**अकोला:** सद्य:स्थितीत हरभऱ्याचे पीक बहुतांश ठिकाणी फुलोरा अवस्थेत आहे. या दरम्यान या पिकावर घाटे अळीच्या प्रादुर्भावाची शक्यता आहे. घाटेअळीच्या एकात्मिक व्यवस्थापनाबाबत जिल्हा अधिक्षक कृषी कार्यालयातर्फे सूचना प्रसारित करण्यात आल्या आहेत. घाटे अळी ही हरभरा पिकाची प्रमुख किड असुन या किडींची मादी पतंग पानावर, कोवळया शेंड्यांवर, कळयांवर व फुलांवर एकेरी अंडी घालते. ही अंडी खसखसीच्या दाण्यासारखी दिसतात. त्यातून २ ते ३ दिवसात अळी बाहेर पडते. ही अळी पानावरील हरितद्रव्य खरडून खाते. त्यामुळे पाने प्रथम पिवळसर पांदूरकी होऊन वाळतात व गळून पडतात. थोडया मोठ्या झालेल्या अळया संपूर्ण पाने व कोवळी देठे खाऊन फस्त करतात.

# तापडिया नगर उड्डाणपुलासह नागरी समस्या सोडविणार– आ. सावरकर

◆भाजपाचे या भागातील नागरिकांचे जीवन सुसह्य करण्यास प्राधान्य ◆प्रचार सभेत आमदार रणधीर सावरकर यांची ग्वाही, भाजपचा प्रचार

प्रतिनिधी १० जानेवारी





**अकोला:** अकोला विकासाचे मॅग्नेट होणार आहे, असा विश्वास व्यक्त करून आमदार रणधीर सावरकर यांनी विकासाचा झरा निरंतर सुरू ठेवण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना निवडून द्या असे आवाहन केले. प्रभाग क्रमांक ३ चे भाजप राष्ट्रवादी युतीचे उमेदवार सागर शेगोकार, प्रशांत जोशी, शशिकला काळे आणि नीतू जगताप यांच्या प्रचार सभेत ते बोलत होते. न्यू तापडिया नगरातील श्री गजानन महाराज मंदिराच्या प्रांगणात शुक्रवारी रात्री सभा झाली

या भागातील नागरिकांना सुविधा उपलब्ध करून देत आहोत. दुबेवाडीतून ३० कोटीचा डीपी रोड, उड्डाणपूल, लगतच्या चाचोंडी साठी मोठा रस्ता, सामान्यांना परवडणारी घरे, भुयारी गटार योजना सहा महिन्यात पूर्ण होईल असे आमदार सावरकर म्हणाले. हे शहर सुंदर करण्यासाठी भाजपचे सागर शेगोकार, प्रशांत जोशी, शशिकला काळे, नीतू जगताप यांना निवडून द्या. विकासाची जबाबदारी माझ्यावर सोपवा असे आवाहन देखील आ. सावरकर यांनी केले. श्री गजानन महाराजांचे दर्शन आणि छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा करून सभेला सुरूवात झाली. श्रीधरराव पागृत, श्याम पाठक, संजय ठाकूर, गजाननराव मानकर, उमेश श्रीवास्तव व्यासपीठावर होते. सागर शेगोकार आणि प्रशांत जोशी यांनी भाजप उमेदवारांना निवडून द्या असे आवाहन केले.

# विश्वकर्मा योजनेतून १८ पगड जातींना न्याय : आकाश फुंडकर

प्रतिनिधी १० जानेवारी



**अकोला** : विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून १८ पगड जातीचा विकास करण्याचा संकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. समाजातील सर्व घटकांना न्याय देण्याचे काम पंतप्रधान आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात सुरू असून अकोला महानगरपालिकेच्या प्रत्येक नागरिकांच्या मूलभूत गरजा तसेच सुखदुःख सहभागी होण्याची किमया भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वात असून आपण भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करा असे आवाहन पालकमंत्री एड. आकाश फुंडकर यांनी केले.

आकाश फुंडकर यांनी शहरातील विविध भागांमध्ये नागरिकांची संवाद साधताना ते बोलत होते. प्रभात १० मध्ये बोलताना ते म्हणाले,

गप्पांचा बाजार न करता सकारात्मक आणि विकासात्मक प्रचाराच्या माध्यमातून भारतीय जनता पक्षाची वाटचाल सुरू आहे. शहराच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये विकासाला गती देण्यासाठी भाजपा राष्ट्रवादी उमेदवारांना विजयी करा. अकोला महानगरपालिकेच्या विकासासाठी शहराच्या सामाजिक समस्या दूर करण्यासाठी अकोला शहराला वैभवशाली शहर बनवण्यासाठी भाजपाला विजयी करा असे आवाहन केले. नामदार फुंडकर शहरातील विविध प्रभागात संवाद साधत आहेत.

# प्रभाग १५ (ड) मधून समर्थ शर्मा यांच्या प्रचाराचा झंझावात

◆ नगरविकास मंत्री व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची अकोल्याला साथ

प्रतिनिधी १० जानेवारी



**अकोला:** अकोला महानगरपालिका निवडणुकीचा रणसंग्राम आता अंतिम टप्प्यात पोहोचला असून, शिवसेनेने एकनाथ शिंदे गटाचे शहरात जोरदार शक्तीप्रदर्शन सुरू केले आहे. प्रभाग क्रमांक १५ (ड) मधून शिवसेनेचे अधिकृत उमेदवार शर्मा समर्थ विजय यांच्या समर्थनार्थ संपूर्ण प्रभागात भगवे वादळ निर्माण झाले असून, मतदारांचा कल स्पष्टपणे शिवसेनेच्या बाजूने झुकताना दिसत आहे.

प्रचारादरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने राबवलेल्या 'लाडकी बहीण योजना', 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' आणि 'शासन आपल्या दारी' यांसारख्या लोककल्याणकारी योजनांचा जोरदार प्रचार केला जात आहे. 'नगरविकास मंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी अकोला शहराच्या विकासासाठी जो भरघोस निधी दिला, त्याचेच फलित आज प्रभागातील जनतेला दिसत आहे,' अशा शब्दांत उमेदवार शर्मा समर्थ विजय यांनी विरोधकांवर तोफ डागली. उमेदवार समर्थ शर्मा यांनी आपल्या प्रचारात प्रामुख्याने प्रभागातील पायाभूत सुविधा, पाणी प्रश्न आणि सामान्य नागरिकांच्या अडीअडचणी सोडवण्यावर भर दिला आहे. 'शहराच्या विकासाला भरघोस निधी' मिळवून देण्याचे आश्वासन देत, त्यांनी मतदारांना 'धनुष्यबाण' या चिन्हासमोरील बटण दाबून प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले आहे.

# भाजपच्या 'पॅनेल'पुढे विरोधक गारद; 'अग्रवाल पॅटर्न'चा झंझावात

◆ अनुभव आणि तरुणाईचा 'परफेक्ट' संगम

प्रतिनिधी १० जानेवारी



**अकोला:** प्रभाग क्रमांक ५ मध्ये भारतीय जनता पार्टीने विजयाचा 'ट्रॅक' कायम ठेवल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. माजी महापौर विजय अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील भाजपच्या पॅनेलने विकासाच्या मुद्यावर विरोधकांना अक्षरशः बॅकफुटवर ढकलले आहे. सध्या प्रचारात या पॅनेलने घेतलेली आघाडी विरोधकांच्या गोटात धडकी भरवणारी ठरत आहे.

अकोल्याचे माजी महापौर विजय अग्रवाल यांनी आपल्या कार्यकाळात प्रभागाचा चेहरामोहरा बदलला. रस्ते, पाणी आणि मूलभूत सुविधांचे जाळे विणून त्यांनी प्रभाग ५ ला 'मॉडेल प्रभाग' म्हणून विकसित केले आहे. 'आम्ही केवळ हवेत गप्पा मारल्या नाहीत, तर जमिनीवर काम करून दाखवले आहे,' अशा शब्दांत अग्रवाल यांनी विरोधकांना चपराक लगावली आहे. त्यांच्या या कामाच्या अनुभवामुळे आणि दूरदृष्टीमुळे मतदारांचा कल पूर्णपणे भाजपच्या दिशेने झुकल्याचे चित्र रॅली आणि सभांमधून दिसत आहे. बंडखोरांनी देखील येथे मान यंदा वर केली नाही हे विशेष. विजय अग्रवाल यांच्या प्रशासकीय अनुभवाला साथ देण्यासाठी अनुभवी आणि तरुण चेहऱ्यांचे अभेद्य पॅनेल मैदानात आहे.

महिलांचे प्रश्न आणि सामाजिक कामात अग्रभागी असलेल्या विद्या खंडारे यांना महिला वर्गाचा अफाट प्रतिसाद मिळत आहे. भाजपचे अकोला शहर प्रमुख असलेले जयंत मसने यांचा संयमी स्वभाव आणि जबरदस्त संघटन कौशल्य भाजपच्या विजयाची खात्री देत आहे. तरुण आणि ज्येष्ठ दोघांमध्येही त्यांची मोठी क्रेझ आहे. नवीन विचार आणि विकासाची स्पष्ट दृष्टी असलेल्या रश्मी अवचार यांच्यामुळे सुशिक्षित मतदार भाजपच्या पाठीशी ठामपणे उभा राहिला आहे.प्रभाग ५ मध्ये भाजपने केवळ प्रचार केला नाही, तर मतदारांच्या घराघरात जाऊन थेट संवाद साधला आहे. एकाच विचारांचे आणि शिस्तबद्ध उमेदवार असल्याने विरोधकांच्या विखुरलेल्या फळीसमोर भाजपचे पारडे प्रचंड जड झाले आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, प्रभाग ५ मध्ये सध्या केवळ 'भाजप' आणि 'विकास' याच दोन गोष्टींची चर्चा आहे. विरोधकांनी कितीही प्रयत्न केले, तरी अग्रवाल यांच्या 'डेव्हलपमेंट पॅटर्न'ला रोखणे आता त्यांच्यासाठी अशक्य असल्याचे बोलले जात आहे.

# शहरात आता विकासाचा 'धनुष्यबाण' तळपणार !

◆ प्रभाग १५ (क) मध्ये श्वेता बाजड 'लोकप्रिय' उमेदवार

प्रतिनिधी १० जानेवारी



**अकोला:** अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत प्रभाग क्रमांक १५ (क) कडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. शिवसेना (शिंदे गट) आणि महायुतीच्या अधिकृत उमेदवार श्वेता लक्ष्मीकांत बाजड यांनी प्रचारात मोठी आघाडी घेतली असून, त्यांच्या जनसंपर्काने विरोधकांच्या गोटात अस्वस्थता निर्माण झाली आहे.

'प्रभागाचा सर्वांगीण विकास आणि महिलांचे सक्षमीकरण हेच माझे ध्येय आहे,' असा ठाम विश्वास श्वेता बाजड यांनी व्यक्त केला आहे. सुशिक्षित चेहरा आणि कामाची तळमळ यामुळे त्यांना तरुण आणि महिला वर्गाचा मोठा पाठिंबा मिळत आहे. १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानात 'धनुष्यबाण' चिन्हासमोरील ३ क्रमांकाचे बटण दाबून त्यांना विजयी करण्याचे आवाहन समर्थकांनी केले आहे. अकोल्याच्या राजकारणात सध्या एकाच नावाची चर्चा आहे, ती म्हणजे श्वेता लक्ष्मीकांत बाजड. प्रभाग १५ (क) मधून नगरसेवक पदासाठी श्वेता बाजाड रिंगणात असून, त्यांच्या प्रचाराला आता जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांचा वारसा घेऊन, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली श्वेता बाजाड मैदानात उतरल्या आहेत. प्रभागातील रस्ते, पाणी आणि स्वच्छतेचे प्रश्न प्राधान्याने सोडवण्याचे आश्वासन श्वेता बाजड यांनी दिले आहे.

# प्रभाग ९ (ब) मधून भाजपच्या अधिकृत उमेदवार सौ. ज्योती वसंत मानकर

◆ भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसच्या महायुतीचे प्रबळ उमेदवार म्हणून आल्या समोर

प्रतिनिधी १० जानेवारी



**अकोला:** अकोल्याचे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या वतीने प्रभाग क्र. ९ (ब) मधून सौ. ज्योती वसंत मानकर या 'कमळ' या चिन्हावर निवडणूक लढवत आहेत. त्यांच्या उमेदवारीमुळे प्रभागात भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, मतदारांकडूनही त्यांना सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

सौ. ज्योती मानकर यांनी आपल्या प्रभागासाठी २४ कलमी जाहीरनामा प्रसिद्ध केला असून, त्याद्वारे महिलांचे सक्षमीकरण आणि पायाभूत सुविधांवर विशेष भर दिला आहे. महिलांसाठी बचत गट शिबिरांचे आयोजन, सुरक्षा हमी आणि महिलांना सक्षम करण्यासाठी विशेष शिबिरे घेण्यावर भर दिला आहे. इतकेच नाही तर प्रभागातील जनतेसाठी २४ तास विनामूल्य ॲम्बुलन्स उपलब्ध करून देणे. प्रत्येक गल्लीत सिमेंट काँक्रीटीकरण, भूमिगत गटार व्यवस्था आणि नियमित पाणीपुरवठा सुनिश्चित करणे.प्रभागातील बगीच्यांचे सौंदर्यीकरण करून तिथे 'ओपन जिम' तयार करणे आणि परिसरात हायमास्ट दिवे बसवणे. भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसच्या या महायतीने प्रभाग ९ मध्ये सौ. ज्योती मानकर यांच्यासोबत भाजप-राष्ट्रवादी युतीचे अन्य तीन उमेदवार देखील रिंगणात आहेत यात अजय रामटेके, शितल गायकवाड यांचा समावेश आहे. सौ. ज्योती मानकर यांनी प्रभागातील सर्व मतदारांना 'कमळ' या चिन्हासमोरील ३ नंबरचे बटण दाबून प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या या विकासवादी भूमिकेमुळे प्रभाग ९ मधील निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जनतेच्या या प्रेमाच्या शिदोरीची झाली शहरात चांगली चर्चा

प्रतिनिधी १० जानेवारी

**अकोला:** अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ चा प्रचार आता शिगेला पोहोचला असून, प्रभाग क्रमांक १६ मध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रभागातील शिवसेना (शिंदे गट) आणि युतीचे अधिकृत उमेदवार रेणू रवी धंजे, वैजयंती राजकुमार मूलचंदानी, राजकुमारी राजकुमार मिश्रा आणि दर्शन (रोशन) राज यांना जनसामान्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सिंधी कॅम्प, कैलास टेकडी या सोळा क्रमांकाच्या प्रभागातील शिवसेना (शिंदे गट) आणि युतीचे अधिकृत उमेदवार रेणू रवी धंजे, वैजयंती राजकुमार मूलचंदानी, राजकुमारी राजकुमार मिश्रा आणि दर्शन (रोशन) राज यांना जनसामान्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रचारादरम्यान एका महत्त्वाच्या घडामोडीत, वाल्मिकी समाजाने शिवसेना उमेदवारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत त्यांना आर्थिक मदतीची देणगी सुपूर्द केली आहे. समाजाच्या वतीने देण्यात आलेली ही मदत केवळ आर्थिक नसून, ती उमेदवारांवरील विश्वासाचे प्रतीक असल्याचे मानले जात आहे.प्रभाग १६ मधील रहिवाशांनी 'आपला उमेदवार, आपल्या हक्काचा माणूस' ही भावना जोपासत या निवडणुकीला लोकचळवळीचे स्वरूप दिले आहे. वाल्मिकी समाजाने दिलेल्या या योगदानामुळे शिवसेना (शिंदे गट) उमेदवारांचे पारडे जड झाले असून, कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारला आहे.यावेळी बोलताना उमेदवारांनी सांगितले की, 'जनतेने स्वतःहून दिलेली ही आर्थिक मदत आमच्यासाठी सर्वात मोठी पावती आहे.

# मतदान कार्ड प्रत्येक घरापर्यंत पोहोचवा - मनपा उपायुक्त

◆ मतदान स्लिप वितरणासाठी ६५० कर्मचाऱ्यांची नियुक्ती

प्रतिनिधी १० जानेवारी



**अकोला:** अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, मतदान टक्केवारी वाढवण्याच्या उद्देशाने महानगरपालिका आयुक्तांच्या आदेशानुसार महापालिका सभागृहात मतदान केंद्र पर्यवेक्षकांची एक महत्त्वाची बैठक पार पडली. अकोला महानगरपालिकेच्या २०२५-२६ च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी विविध माध्यमांतून जनजागृती मोहीम राबवली जात आहे. निवडणूक प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या मतदान स्लिपचे वितरण करणे अनिवार्य असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. अकोला महानगरपालिकेच्या एकूण २० प्रभागांमधील मतदार याद्यांवर काम करणारे ५० पर्यवेक्षक, त्यांच्या अंतर्गत असलेले ५०० बीएलओ आणि १५० आशा स्वयंसेविका असे एकूण ६५० कर्मचारी या स्लिपचे वितरण करणार आहेत. हे वितरण कार्य ९ ते १३ जानेवारी २०२६ या कालावधीत पूर्ण केले जाणार आहे. या मोहिमेला मतदारांनी १०० टक्के सहकार्य करावे, अशी अपेक्षा उपायुक्त विजय पारतवार यांनी व्यक्त केली. या बैठकीला उपायुक्त विजय पारतवार, निवडणूक विभाग प्रमुख अनिल बिडवे, संजय राजनकर, आरोग्य अधिकारी डॉ. अनूप चौधरी आणि सर्व पर्यवेक्षक उपस्थित होते.

# तुम्ही भाजप राष्ट्रवादीला मत द्या विकासाची हमी मी देतो : आमदार रणधीर सावरकर

प्रतिनिधी १० जानेवारी



**अकोला** : भूमिगत गटार योजना अंतर्गत महानगरातील रस्ते खराब होणार असून त्या खराब रस्त्यांना सिमेंट काँक्रेट करून करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे अभिवचन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. हद्दवाढ क्षेत्रामध्ये १३८ कोटी रुपये सह विशेष निधी मिळेल. १५ तारखेला आपण भारतीय जनता पक्ष राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना विजयी करा १६ तारखेपासून विकासाची हमी मी घेतो अशा शब्दात आमदार रणधीर सावरकर यांनी मतदारांशी संवाद साधला.

प्रभाग आठ मध्ये पद यात्रेच्या माध्यमातून नागरिकांशी संवाद साधताना ते बोलत होते.

भूमिगत गटार योजना अमृत योजना च काम मोठ्या प्रमाणात महानगरात सगळ्या ठिकाणी होत असून यात कामामुळे रस्ते खराब होणार असून यासाठी सुद्धा निधी उपलब्ध करून देण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजूर केला असून आपण केवळ ट्रिपल इंजिनचा सरकार आणण्यासाठी भाजपाचे उमेदवार माधुरी शिरसागर तुषार भिरड, राजेश्वर धोटे रंजना विंचनकर यांना विजयी करा असे आवाहन तसेच प्रभाग १० मधील वैशाली शेळके मंजुषाताई शेळके अनिल गरड नितीन ताकवले, प्रभाग नऊ मधील भाजपा राष्ट्रवादीचे उमेदवार अजय रामटेके शीतल गायकवाड ज्योती मानकर हर्ष चौधरी, यांना विजयी करा शहराचा विकास करण्यासाठी तसेच वेगवेगळ्या समाजाचा साठी समाज मंदिरे बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी भारतीय जनता पक्ष प्रतिबद्ध असून दिलेल्या शब्दाची पूर्तता करण्यासाठी खासदार अनुप धोत्रे यांच्या माध्यमातून अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघात विकास केल्याशिवाय आम्ही राहणार नाही असाही विश्वास आमदार सावरकर यांनी दिले. पद यात्रेच्या माध्यमातून आमदार रणधीर सावरकर यांनी आतापर्यंत दोन लाखावर नागरिकांशी वेगवेगळ्या माध्यमातून संवाद साधला आहे.

पद यात्रेमध्ये डॉ. सुभाष लवाळे, रवी दुतोंडे, रुपेश फाटे, चंदू जानोरकर, डॉ. किशोर मालोकार, डॉ. अमित कावरे, डॉ. अभय जैन डॉक्टर राजेश देशपांडे, एड. सुभाष सिंग ठाकूर, डॉ. सतीश उटांगळे, डॉ. सुमित ,फोकमारे, उमेश पवार, निलेश दिनोरे, निलेश निनोरे,अंबादास उमाळे, गणेश तायडे, किशोर कुचके, राजेश बेले, शंकरराव वाकोडे, उदय थोरात, सुरज शेळके, रमण पाटील, शिव शर्मा, विवेक भरणे, पुरुषोत्तम झांबरे, डॉ. संजय चितलांगे, खुसे, धुसे, उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. १० जानेवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# आयएएस अधिकाऱ्याला 'पॉकीट'ची ऑफर

## जलसंपादाच्या उपअभियंत्यासह ठेकेदारावर गुन्हा

प्रतिनिधी १० जानेवारी

**यवतमाळ** : कोची-आंबेझरी भूसंपादन प्रकल्पाच्या मुद्यावर चर्चा सुरू असताना अभियंता ठेकेदाराला भेटवून आयएएस अधिकाऱ्याला पैसे देण्याचा प्रयत्न करीत होता.

याबाबत रंजन यांनी स्पष्ट केले की, उच्च न्यायालयाने भूसंपादनासाठी नवी मार्गदर्शक तत्वे जारी केली असून, कोणत्याही प्रकारची लाच स्वीकारली जाणार नाही कोणत्याही प्रकारची लाच स्वीकारली जाणार नाही. असा पवित्रा घेत थेट पोलिसांनी फोन लावुन तक्रार दिली. त्यावरुन पोलिसांनी जलसंपदा विभागाच्या अभियंत्यासह ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्यात आला.

सहायक जिल्हाधिकारी तथा एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी आयएएस अमित राजेंद्र रंजन यांच्या कार्यालयात ८ जानेवारी रोजी दुपारी सुमारे १ वाजताच्या सुमारास उपअभियंता त्रिलोक जयप्रकाश त्रिपाठी (रा. यवतमाळ) रंजन यांच्या कार्यालयात आला. कोची-आंबेझरी भूसंपादन प्रकल्पाच्या मुद्यावर चर्चा सुरू असताना तो ठेकेदाराला भेटवून पैसे देण्याचा प्रयत्न करत होता. याबाबत रंजन यांनी स्पष्ट केले की, उच्च न्यायालयाने भूसंपादनासाठी नवी मार्गदर्शक तत्वे जारी केली असून, कोणत्याही प्रकारची लाच स्वीकारली जाणार नाही. त्रिपाठीने मात्र ऐकण्यास नकार दिला. दुपारी ३ ते ३.१५ वाजताच्या सुमारास ठेकेदार कामेश विराण्णा डुल्ला (रा. नागपूर) याला सोबत घेऊन पुनः भेटीस आला. यावेळी दोघांनी रंजन यांना पैसे देण्यासाठी पाकिट ऑफर केले, परंतु रंजन यांनी ते पाकिट न घेता ताबडतोब पोलिसांना फोन केला आणि लाचखोरांचा पर्दाफाश केला. संपूर्ण घटना कार्यालयातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. पांढरकवडा पोलिसांनी आयएएस अधिकारी रंजन यांच्या तक्रारीवरून त्रिपाठी, डुल्ला यांच्याविरुद्ध लाचखोरीचा गुन्हा दाखल केला आहे. तपास उपविभागीय पोलिस अधिकारी रॉबीन बन्सल करीत आहेत. यावेळी अनेकांनी यावर "पारदर्शक प्रशासन आणि नियमांचे पालन नागरिकांसाठी आवश्यक" असे मत व्यक्त केले आहे.

## अवैध तांदूळ वाहतूक करणारा ट्रक पकडला

प्रतिनिधी १० जानेवारी

**पांढरकवडा** : अवैध तांदळाची वाहतूक करणारा ट्रक महसूल विभागाने पकडला. या कारवाईत सुमारे १२० क्विंटल तांदूळ आणि ट्रक असा लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई ८ जानेवारी रोजी दुपारच्या सुमारास तालुक्यातील बारा-कवठा गावाजवळ करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, उपविभागीय अधिकारी अमित रंजत यांच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, तालुक्यातून अवैधरित्या तांदळाची वाहतूक करणारा एक ट्रक बाघाघाट येथे जात आहे. या माहितीवरून केळापूर महसूल विभागाच्या पथकाने वारा कवठा शिवारात सापळा रचला. यावेळी संशयास्पद वाटणारा ट्रक क्रमांक एमपी २२ एच १२३६ अडवून त्याची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ट्रकमध्ये मोठ्या प्रमाणात तांदळाचा साठा आढळून आला. प्राथमिक चौकशीनुसार, हा तांदूळ मध्य प्रदेशातील बालाघाट येथे नेला जात होता. या प्रकरणी ट्रक चालक मनोज कुमार (रा. बालाघाट, मध्य प्रदेश) याला ताब्यात घेण्यात आले. तांदळाचा हा साठा नेमका कुठून आणला गेला आणि याचा मालक कोण आहे, याचा तपास सुरू करण्यात आला आहे. महसूल विभागाने जप्त केलेला तांदळाने भरलेला ट्रक पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी पांढरकवडा पोलीस स्टेशनच्या स्वाधीन करण्यात आला आहे.

# खून करुन मृतदेह फेकला

## मृतकाची ओळख पटविण्याचे आवाहन



प्रतिनिधी १० जानेवारी

> ठाणेदार पांडुरंग शिंदे यांनी सांगितले, "आम्ही सर्व बाजूंनी तपास करत आहोत आणि लवकरच या अज्ञात इसमाची ओळख पटवून आरोपींच्या मुसक्या आवळू." घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांनीही भेट देऊन पाहणी केली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**ढाणकी** : मुरली बांधाऱ्याच्या परिसरात आज सकाळी एका फारीत बांधलेल्या अवस्थेत अज्ञात पुरुषाचा मृतदेह सापडल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्राथमिक तपासानुसार ही हत्या करून मृतदेह नदीपात्रात टाकल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

काल सकाळी काही स्थानिक नागरिक मुरली बांधाऱ्याजवळून जात असताना दुर्गंधी जाणवली. परिस्थिती तपासली असता, पाण्याजवळ एका पोत्यात दोरीने घट्ट बांधलेला मृतदेह पडलेला दिसून आला. नागरिकांनी तातडीने स्थानिक पोलीस स्टेशनला माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच ठाणेदार पांडुरंग शिंदे, पोलीस उपनिरीक्षक सागर अन्नमवार, पोलीस शिपाई दत्ता कवडेकर व प्रवीण जाधव घटनास्थळी पोहोचले. पंचनाम्यानंतर फारी उघडल्यावर अंदाजे ३० ते ३२ वयोगटातील पुरुषाचा मृतदेह सापडला. प्राथमिक अंदाजानुसार, हा इसम सुमारे १० दिवसांपूर्वी खून करून नदीत फेकला गेला असावा. मृतदेह फारीत गुंडाळला असल्याने आणि त्यावर काही खुणा असल्याने आरोपींनी पुरावा नष्ट करण्यासाठी असा प्रयत्न केला असण्याची शक्यता आहे. शवविच्छेदन डॉ. हांडे यांनी घटनास्थळीच केले. पोलीस आता परिसरातील बेपत्ता व्यक्तींच्या तक्रारींची पडताळणी करत आहेत, तसेच मुरली बांधाऱ्याकडे जाणाऱ्या रस्त्याची तपासणी सुरू आहे.

# अंबाळीत २७ वर्षांची रोट पंचावतार महाप्रसाद परंपरा

## सात हजार भाविकांची उपस्थिती

प्रतिनिधी १० जानेवारी

**उमरखेड** : महानुभाव पंथाची काशी म्हणून ओळख असलेल्या जागृत देवस्थान श्री दत्तात्रेय प्रभू संस्थान, अंबाळी येथे अखंड श्रीमद्भगवद्गीता प्रवचनाचा सातदिवसीय सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला. दि. २९ डिसेंबर ते ५ जानेवारी या कालावधीत महंत चिरडे बाबा यांच्या अमृतवाणी प्रवचनांनी परिसर भारावून गेला. या सोहळ्यांतर्गत रोट पंचावतार उपहार महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. ही परंपरा गेल्या २७ वर्षांपासून प.पू. श्री गोविंदराज दादा दुतोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली अखंडपणे सुरू आहे. या वर्षीही परप्रांतातून तसेच परिसरातील हजारो भाविक भक्त अंबाळी येथे दाखल झाले. सात दिवस दररोज अन्नदान, पंगत, प्रवचन, नामस्मरण व पारायण असे धार्मिक कार्यक्रम पार पडले.



दि. ५ जानेवारी रोजी महानुभाव पंथीय धर्मसभेचे आयोजन करण्यात आले होते. या धर्मसभेला महंत बाभुळकर बाबा शास्त्री, आचार्य लोणारकर बाबा, अनंतव्यास बाबा कामळज, कान्हेराज बाबा रोही पिंपळगाव, महंत योगीराज बापू हदगाव, गोपीराज बाबा इजळी, येल्हेराज बाबा, कृष्णराज बाबा, संन्यासी बाबा उमरखेड, विजयराज शास्त्री खामणीकर, सारंगधर बाबा बाळापूर, माधाळीकर बाबा मोघाळी, गौरव दादा संन्यासी आदी संत-महंतांची उपस्थिती लाभली.

> श्री दत्त प्रभूंच्या जागृत स्थानामुळे अंबाळी येथे दरवर्षी रोट पंचावतार उपहार महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. गेल्या २७ वर्षांपासून अखंड सुरू असलेल्या या परंपरेसाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक दर्शनासाठी येतात. साधुसंत, महंत व भक्तांनी मोठ्या श्रद्धेने महाप्रसादाचा लाभ घेतला.
> - प.पू. श्री गोविंदराज दादा दुतोंडे, अंबाळी

संतांनी आपल्या प्रवचनांतून भक्तांना ज्ञान व भक्तीचा बोध दिला. रोट पंचावतार उपहार महाप्रसादाचा लाभ सुमारे सात हजार भाविकांनी घेतला. कोसो लांबून साधुसंत व भाविक या कार्यक्रमासाठी अंबाळी येथे दाखल झाले होते. महाप्रसादाची व्यवस्था गणेशराव मुंगल (इजळीकर) यांनी पाहिली. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थानचे उपाध्यक्ष भीमराव पाटील चंद्रवंशी यांनी आभार मानले.

# महागाव कृषी बाजार समितीत सत्तांतर; रवींद्र पवार २५ वे सभापती

प्रतिनिधी १० जानेवारी

**महागाव** : महागाव तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीतील राजकीय वर्तुळात काही दिवसांपासून सुरू असलेल्या सत्तासंघर्षावर अखेर पडदा पडला. माजी सभापती गुलाब जाधव यांविरोधात १५ संचालकांनी मंजूर केलेल्या अविश्वास ठरावानंतर रिक्त झालेल्या सभापती पदासाठी आज निवडणूक पार पडली. या निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट) चे संचालक रवींद्र पवार बहुमताने २५वे सभापती म्हणून निवडले गेले.

गुलाब जाधव यांचा 'मनमानी कारभार' या कारणामुळे बाजार समितीतील १५ संचालकांनी एकत्र येऊन बंड पुकारले. अविश्वास ठराव यशस्वी झाल्यानंतर जाधव यांना पद सोडावे लागले. जिल्हा उपनिबंधकांच्या आदेशानुसार आज बाजार समिती सभागृहात विशेष सभा



आयोजित करण्यात आली होती, जिथे सभापती पदासाठी निवडणूक पार पडली.

सभापती पदासाठी शिवसेना (शिंदे गट) कडून रवींद्र पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. बाजार समितीतील १८ संचालकांपैकी १५ संचालकांनी निवडणूक प्रक्रियेत सहभागी होऊन सर्वांनी एकमताने पवार यांना कौल दिला. मतदान प्रक्रियेत उपसभापती रामेश्वर करपे, गजेंद्र देशमुख, वासुदेव नेवारे, किशोर देशमुख, विनोद राऊत, कृष्ण राऊत, निरंजन धनगर, उकांडा राठोड, पुंडलिक भुरके, परमेश्वर जाधव, विजय कृष्णापुरे, रितेश पुरोहित, विनोद भगत आणि पुष्पाताई ठाकरे यांनी मतदान केले.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ए. एस. मस्के (सहकार अधिकारी, पुसद) यांनी जबाबदारी सांभाळली, तर त्यांना एस. एस. पिंपरखेडे व जी. एस. साळवे यांनी सहकार्य केले. बाजार समितीचे सचिव अभिजित गुगळे यांनी प्रशासकीय कामकाज पाहिले.

नुतन सभापती रवींद्र पवार यांची निवड झाल्यानंतर शिवसेना (शिंदे गट) उपजिल्हा प्रमुख डॉ. बी. एन. चव्हाण, तालुका प्रमुख राजू राठोड, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रवीण ठाकरे, काँग्रेसचे इरफान सय्यद, लखन राठोड, गुणवंत राठोड, संतोष राठोड, विनोद खोंडे, विनोद जगताप, चयन राठोड, किशोर घाटोळे यांनी पुष्पहार घालून अभिनंदन केले.

माजी सभापती गुलाब जाधव यांनी निवडणुकीनंतर संचालकांकडून पैशांची मागणी होत असल्याचा आरोप केला होता. मात्र बाजार समितीतील वर्तुळात अशी चर्चा आहे की, जाधव यांनी पुनः खुर्ची मिळवण्यासाठी संचालकांना ३ लाख रुपयांची ऑफर दिली होती; मात्र एकही संचालकाने त्याची दखल घेतली नाही. संचालकांनी सांगितले, "जर आम्हाला पैशांचीच हाव असती, तर जाधव यांची ऑफर स्वीकारली असती. आम्ही तत्वासाठी एकत्र आलो आहोत." या निर्णयामुळे महागाव कृषी बाजार समितीत शिवसेना (शिंदे गट) सत्तासंपन्न ठरली असून समितीतील कारभार अधिक पारदर्शक व समन्वयपूर्ण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अनुष्का हत्येप्रकरणी न्यायाची मागणी

## भीम आर्मी–आजाद समाज पार्टीचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

प्रतिनिधी १० जानेवारी

**पुसद** : जवाहर नवोदय विद्यालय, लातूर अंतर्गत असलेल्या वसतिगृहात शिक्षण घेत असलेल्या इयत्ता सहावीतील कु. अनुष्का किरणकुमार पाटोळे (वय १२) हिच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी भीम आर्मी व आजाद समाज पार्टी (का.) यांच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांना उपविभागीय अधिकारी, पुसद यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी भीम आर्मी यवतमाळ जिल्हाध्यक्ष अशोक भालेराव व आजाद समाज पार्टी (का.) युवा



जिल्हाध्यक्ष राजकुमार भगत यांनी प्रशासनाच्या भूमिकेचा तीव्र शब्दांत निषेध केला. शाळेच्या संरक्षणाखाली असताना एका गरीब कुटुंबातील अल्पवयीन मुलीचा मृत्यू होणे ही शैक्षणिक व्यवस्थेची गंभीर निष्काळजीपणा व संवेदनशून्यतेची परिणती असल्याचे त्यांनी नमूद केले. हा मृत्यू हत्या आहे की आत्महत्येस प्रवृत्त केलेले कृत्य, याची निष्पक्ष व पारदर्शक चौकशी होणे आवश्यक असताना प्रशासनाकडून दिरंगाई होत असल्याचा आरोप करण्यात आला.

या प्रकरणात दोषींवर तत्काळ गुन्हा दाखल करावा, मृत अनुष्काच्या कुटुंबाला भरीव आर्थिक मदत द्यावी, तसेच प्राचार्य, शिक्षक, वसतिगृह अधीक्षक, कर्मचारी व संबंधित अधिकाऱ्यांना अटक करून निलंबित करावे, अशी मागणी करण्यात आली. प्रकरणाची CID, SIT किंवा CBI मार्फत स्वतंत्र चौकशी करावी तसेच दोषींना वाचविण्याचा प्रयत्न झाल्यास लातूर जिल्हाधिकाऱ्यांवरही कारवाई करावी, अशी ठाम भूमिका मांडण्यात आली.

यावेळी अजय लोखंडे, वैभव सूर्यवंशी, राहुल धुळे, करण खंदारे, शांतीशील जाधव, राजाभाऊ गुंजकर, संजय धुळधुळे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. "अनुष्काला न्याय मिळालाच पाहिजे, अन्यथा आंदोलन तीव्र केले जाईल," असा इशारा देण्यात आला.

# तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत चॅम्पियन शील्डचे विमोचन

प्रतिनिधी १० जानेवारी

**यवतमाळ** : शैक्षणिक सत्र २०२५-२६ साठी जिल्हा परिषद यवतमाळ व्दारा आयोजित तालुकास्तरीय शालेय स्पर्धेचा गौरव चषक (शिल्ड) आज विधीमान्य हस्ते प्रकट केला गेला. यवतमाळ जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था, र. नं. १०९, या संस्थेच्या वतीने आयोजित या सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमात आदिवासी मंत्री ना. डॉ. अशोक उईके यांनी शिल्डचे विमोचन केले.

राळेगाव तालुक्यात संपन्न झालेल्या या स्पर्धेत जिल्ह्यातील १६ तालुक्यांचे शालेय खेळाडू व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला, तर चॅम्पियन शील्ड तसेच



समूह खेळांसाठी विशेष शील्डचा समावेश करण्यात आला होता. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच सांस्कृतिक व क्रीडा कौशल्यांचा विकास साधला जातो, असे ना. उईके यांनी सांगितले. मंत्री उईके यांनी या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांचे कौतुक करत त्यांच्या मेहनतीला प्रोत्साहन दिले. तसेच, जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था र. नं. १०९ संस्थेने समाजातील शैक्षणिक, सामाजिक व क्रीडा क्षेत्रात केलेल्या योगदानाचे कौतुक करून, समाजाच्या उन्नतीसाठी संस्थेची भूमिका महत्त्वाची असल्याचे नमूद केले.

या कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष महेश सोनेकर, उपाध्यक्ष संजय गावंडे, सचिव संजय विहाडे आणि सर्व संचालक उपस्थित होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांचे उत्साहवर्धन करण्यासाठी चषकांचे महत्व स्पष्ट केले.

जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था र. नं. १०९ ने या उपक्रमाला प्रायोजकत्व देऊन विद्यार्थ्यांना क्रीडा, कला आणि सामाजिक बांधिलकीसाठी प्रेरित करण्याचा प्रयत्न केला आहे. याचा उद्देश केवळ पुरस्कार वितरणापुरता मर्यादित न राहता विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, नेतृत्वगुण आणि स्पर्धात्मक वृत्ती निर्माण करणे हा आहे.

हा उपक्रम स्थानिक शाळा, शिक्षक आणि पालक वर्ग यांच्यातील समन्वय वाढविण्यासही महत्त्वाचा ठरला असून, विद्यार्थ्यांच्या सामूहिक आणि वैयक्तिक क्षमतांचा विकास करण्यास हातभार लावेल, असे कार्यक्रम संयोजकांनी नमूद केले.

# शेंबाळपिंपरीत पत्रकार बांधवांचा सन्मान सोहळा

प्रतिनिधी १० जानेवारी

**पुसद** : शेंबाळपिंपरी गावातील सामाजिक, शैक्षणिक आणि कृषी विकासासाठी केलेल्या कार्यात पत्रकारांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते जैनुल सिद्दीकी यांनी या सोहळ्यात केले.गाव व परिसरातील शेतकरी, शेतमजूर, महिला बचत गट, रोजगार, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, विकास तसेच सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील अन्याय व हक्कांसाठी शेतकरी पुत्रांनी शांतीपूर्ण मार्गाने केलेल्या यशस्वी आंदोलने, राज्य शासनाच्या विविध लोकोपयोगी उपक्रमात सक्रिय सहभाग, तसेच पत्रकार मित्रांच्या सहकार्यामुळे शेंबाळपिंपरीला तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. या उपक्रमामुळे गावातील विकासासाठी लाखो रुपयांचा निधी, सन्मानचिन्हे व सन्मानपत्रे मिळाल्याचे जैनुल सिद्दीकी यांनी मनोगतात नमूद केले.

यशस्वी पत्रकार सत्कार सोहळा सरपंच रविंद्र महल्ले यांच्या वतीने आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून दिलीपराव देशमुख उपस्थित होते, तर प्रमुख अतिथी म्हणून पश्चिम विदर्भ फेसकॉमचे सदस्य रेणुकादास जोशी, सामाजिक कार्यकर्ते रऊफोद्दीन सिद्दीकी, बापुराव कांबळे, दत्तराव देशमुख बेळमंडळकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सत्कार सोहळ्यात दैनिक नवराष्ट्रचे गुलाबराव



वाहूळे, दैनिक सकाळचे मंगेश पारटकर, दैनिक देशोन्नतीचे मदन बडगुजर, दैनिक तरुण भारतचे विजय चव्हाण, दैनिक मतदारचे मुन्ना सिद्दीकी, मुकाबला न्यूज युट्यूब चॅनलचे शेख शाकेर, हिंद न्यूज चॅनलचे शैलेश मेटकर, न्यूज ऑफ इंडिया चॅनलचे शेख सलमान, ई-मराठी न्यूजचे शहादत खान यांचा शाल व हार देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच रविंद्र महल्ले यांनी केले, सूत्रसंचालन राजेश वाहूळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन फयाज सिद्दीकी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हाफीज मुजफ्फरोद्दीन सिद्दीकी, अक्षय महल्ले, अहेमद उर्फ अम्मू सिद्दीकी, कुमार शिर्डे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नो पार्किंग झोनमध्ये अवैध प्रवासी वाहतूक

## कारवाई कागदावरच; नागरिकांचा जीव धोक्यात?

प्रतिनिधी १० जानेवारी

**उमरखेड** : उमरखेड बस स्थानक परिसरातील २०० मीटर नो पार्किंग झोनमध्ये अवैध प्रवासी वाहतूक सुरू असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने गेल्या आठवड्यात संबंधित विभागात निवेदन देऊन सदर ट्रॅव्हल्सवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती, मात्र अद्याप नियमांप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

उमरखेड-यवतमाळ मार्गावरून जाणाऱ्या ट्रॅव्हल्समध्ये प्रवासी बस स्टॉपच्या गेटजवळच भरले जातात. त्यामुळे वाहतुकीची कोंडी, अपघातांचा धोका तसेच प्रवाशांना तिकिटामध्ये कमतरता दाखवून महामंडळाच्या आर्थिक नुकसानीस



कारणीभूत होण्याचे प्रकार घडत आहेत. या ट्रॅव्हल्समध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसवल्याने नागरिकांची सुरक्षा धोक्यात येत असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. सदर विषय नागरिकांचे जीव धोक्यात आणणारा असून, पत्रकारांनी यासंबंधी वृत्तपत्रांत प्रकाशित केलेले अनेक रिपोर्ट्स असूनही प्रशासनाचे दुर्लक्ष दिसून आले आहे. नागरिकांच्या तक्रारी असूनही बस स्थानकात नियमांचे पालन न होणे प्रशासनाचा "डोळे असूनही आंधळेपणा" असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते करीत आहेत. यवतमाळ येथील विभाग नियंत्रकांना पत्राद्वारे महाव्यवस्थापक वाहतूक विभाग मुंबई यांनी उमरखेड बस स्टॉपच्या २०० मीटर झोनमधील अवैध प्रवासी वाहतुकीवर तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. आगार व्यवस्थापक उमरखेड यांना या आदेशाची पूर्तता करण्यास सांगितले गेले आहे. प्रशासनाने दखल न घेतल्यास आंदोलन करण्याचा इशारा प्रहार जनशक्ती पक्षाचे शहर प्रमुख राहुल मोहितवार यांनी दिला आहे.

## जाहीर नोटीस

अर्जदार :- श्री. दिवाकर महादेव दरवडे
रा. तेजापुर ता. वणी जि. यवतमाळ

गैरअर्जदार :- निबंधक, उपनिबंधक जन्म मृत्यू नोंदणी तेजापुर
ता. वणी जि. यवतमाळ

विषय :- जन्म / मृत्यु नोंद आदेश मिळण्याबाबतब

ज्याअर्थी, श्री. दिवाकर महादेव दरवडे रा. तेजापुर ता. वणी जि. यवतमाळ यांनी यांचा जन्म दिनांक-16/06/1992 रोजी ग्रामपंचायत कार्यालय- तेज़ापुर येथे झाला परंतु त्यांचे जन्माची नोंद जन्म/मृत्यू नोंदणी अभिलेखामध्ये उपलब्ध नसल्यामुळे सदर नोंद ग्रामपंचायत कार्यालय तेजापुर ता. वणी येथील जन्म/मृत्यू नोंदणी अभिलेखामध्ये घेण्याचा आदेश पारीत करण्याकरिता जन्म मृत्यू अधिनियम 1969 चे कलम 13 चे कलम (3) अन्वये यांनी विनंती अर्ज या कार्यालयास सादर केला आहे.करिता सर्व नागरीकांना याद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जानुसार उपरोक्त व्यक्ती यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय-तेजापुर ता. वणी येथील जन्म-मृत्यु नोंदणी अभिलेखामध्ये घेण्याबाबत ज्या कोणासही काही सांगावयाचे असल्यास अथवा काही आक्षेप घ्यावयाचा असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसाचे आत या न्यायालयात हजर राहुन आपण किंवा आपल्या वकीलामार्फत सर्व पुरावे तसेच उपलब्ध असलेल्या दस्तऐवजासह आपले आक्षेप दाखल करावे.याद्वारे पुढे असेही जाहीर करण्यात येते की, वर नमुद केल्याप्रमाणे विहीत मुदतीत कोणतेही आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणाला काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन सदर अर्जावर सुनावणी करण्यात येवुन आदेश पारीत करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

(शिक्का)

स्वा./-
तहसिलदार, वणी

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शनिवार दि. १० जानेवारी २०२६




## प्रशासन मेहेरबान, भ्रष्टअधिकाऱ्यांचे स्व-दान...

# विहिरीआधी फळबागेचे अनुदान !

## * कृषी व महसूल विभागाचा अजब कारभार, कागदोपत्री केला भ्रष्टाचार

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात शेतकऱ्यांसाठी सरकारकडून अनेक योजना राबविण्यात येत आहेत. विशेष बाब म्हणजे, आकांक्षित जिल्हा असल्याने सरकारच्या प्रत्येक योजनेत वाशिम जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे. मात्र संनियंत्रण करणाऱ्या प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे अनेक योजनांच्या मुख्य उद्देशालाच 'खो' दिला गेला आहे.

रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथे विहीर खोदण्याआधीच काही लाभार्थ्यांच्या बँक खात्यात फळबाग लागवड योजनेचे अनुदान जमा करण्यात आले आहे. सदर धक्कादायक प्रकारामुळे कृषी व महसूल विभागाच्या या अजब कारभाराने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या बाबत दाखल करण्यात आलेल्या तक्रारीची सखोल चौकशी करण्यात येत आहे. तपास अधिकारी अनिल राठोड यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून प्राथमिक चौकशी अहवाल वरिष्ठांकडे पाठविला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. मात्र या गंभीर प्रकारामुळे आता अनेक तक्रारी पुढे येत असून बोरखेडी, मोप, मोरगव्हाण, भर जहाँगीर आदी गावांसह संपूर्ण तालुक्यात हे लोण पसरले आहे.

जिल्ह्यातील शेती आणि शेतकरी सक्षम व समृद्ध करण्यासाठी अनेक अनुदानित योजना सुरू करण्यात आल्या आहेत. त्यात अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना असलेली नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा या योजनेचा पहिला टप्पा संपुष्टात सुद्धा आला आहे. या योजनेत समाविष्ट गावांचा कायापालट होईल अशी सरकारची अपेक्षा होती. मात्र शासनाच्या या स्तुत्य हेतुला हरताळ फासला गेला आहे. सबंधित प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे काही लाभार्थ्यांनी शासनाच्या डोळ्यात धूळ फेकत नियमबाह्य अनुदानावर डल्ला मारल्याचे प्रकार आता उघडकीस येत आहेत. रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील काही लाभार्थ्यांनी विहीर खोदण्याआधीच फळबाग लागवड अनुदान हडप केले असल्याची माहिती हाती आली आहे. याबाबतचे सर्व पुरावे माहितीच्या अधिकारातून मिळाले असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. परंतु हा सर्व प्रकार घडत असताना प्रशासनातील सबंधित अधिकारी झोपेत होते का ? असा सवाल योजनेतून डावलले अनेक पात्र शेतकरी उपस्थित करत आहेत. प्रशासनाच्या या अजब कारभाराने भविष्यात राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. या गंभीर प्रकाराची वरिष्ठ स्तरावरून सखोल चौकशी करावी अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

त्या अनुषंगाने शेलुखडसे येथील एका शेतकऱ्याने राज्याचे मुख्यमंत्री व प्रशासनातील वरिष्ठ स्तरावर तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीची दखल घेत चौकशी समिती नेमण्यात आली आहे. या गंभीर तक्रारीची प्राथमिक चौकशी पूर्ण झाली असून पुढील कार्यवाहीला गती मिळावी अशी अपेक्षा तक्रारदार यांनी व्यक्त केली आहे.



### विहिरीचे पाणी मुरते कुठे ...



वास्तविक पाहता, शासकीय निकषांनुसार फळबाग लागवड योजना घेण्यासाठी सबंधित लाभार्थ्यांच्या सात बारा उताऱ्यावर विहीर असणे महत्त्वपूर्ण आहे. जर सात बारावर विहीर असेल तरच फळबाग घेता येऊ शकते ही बाब अनपढ शेतकऱ्याला सुद्धा माहिती आहे. त्यामुळे अनेकांची फळबाग घेण्याची ईच्छा असून देखील त्यांना डावलण्यात आले होते. परिणामी नाविलाजास्तव अनेक शेतकऱ्यांना या लाभापासून वंचित राहावे लागले आहे. कारण विहीर ही फळबाग लागवडीसाठी आवश्यक असलेल्या पाण्याच्या स्त्रोताचे मुख्य भाग आहे. आणि फळबाग योजनेत विहिरीसाठी वेगळे अनुदान दिले जाते. मात्र त्यासाठी पहिले विहीर खोदून पाणी उपलब्ध केल्यावरच फळबाग लागवडीसाठी अनुदान दिले जाते ही बाब केवळ अधिकाऱ्यांनाच नव्हे; तर भोळ्याभाबड्या शेतकऱ्यांना सुद्धा अवगत आहे. मग सदर प्रकरणातील विहिरीचे पाणी मुरते कुठे ? हा प्रश्न आता हेच भोळेभाबडे शेतकरी सबंधित प्रशासनाला विचारत आहेत. यात सबंधित कर्मचारी व तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. या गंभीर प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी तालुक्यातील शेतकरी करीत आहेत.




## थोडक्यात

### निजामपूरचे 'श्रीरामपूर' नामांतर लवकरच?

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●



रिसोड तालुक्यातील रिसोड शहरालगत असलेल्या मौजे निजामपूर ग्रामपंचायतीच्या नामांतराचा ऐतिहासिक निर्णय आता अंतिम टप्प्याकडे जात असल्याचे चित्र आहे. गावाचे नाव बदलून 'श्रीरामपूर' करण्याच्या प्रक्रियेला लोकनियुक्त सरपंच उषा किसन जाधव यांच्या ठाम नेतृत्वामुळे निर्णायक वेग मिळाला आहे.

मोगलाई निजामशाहीच्या काळातील 'निजामपूर' हे नाव बदलावे, ही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामस्थांकडून प्रलंबित होती. मात्र, सरपंच पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर उषा किसन जाधव यांनी या संवेदनशील विषयाला प्राधान्य देत ग्रामस्थांच्या भावना शासनदरबारी प्रभावीपणे मांडल्या. त्यांच्या पुढाकाराने ग्रामपंचायतीत अधिकृत ठराव मंजूर करण्यात आला असून, नामांतराचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला आहे. ग्रामविकासाच्या दृष्टीने तसेच ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन गावाला नवी, सन्मानाची ओळख मिळावी, हा सरपंचांचा स्पष्ट हेतू असल्याचे ग्रामस्थांकडून सांगितले जात आहे. सरपंच उषा किसन जाधव यांच्या या निर्णयात्मक भूमिकेमुळे ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत असून, निजामपूरचे नाव 'श्रीरामपूर' होण्याची अपेक्षा आता अधिक बळावली आहे.

'निजामशाहीच्या काळातील 'निजामपूर' हे नाव बदलून 'श्रीरामपूर' करणे ही केवळ नामांतराची प्रक्रिया नसून, ग्रामस्थांच्या भावना आणि आपल्या लोकशाही मूल्यांचा सन्मान आहे. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आम्ही याबाबत ठराव मंजूर केला असून, शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे. ग्रामस्थांच्या सहकार्याने लवकरच हे नामांतर प्रत्यक्षात येईल, असा विश्वास आहे.'

**सौ उषा किसन जाधव**

### तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●



मंगरूळपीर जिल्हा परिषद उच्च माध्यमिक शाळा, मंगरूळपीर येथे सोमवार दि. ५ जाने.२०२६ रोजी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन उत्साहात पार पडली या प्रदर्शना मध्ये तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी विज्ञान व तंत्रज्ञानावर आधारित नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनात GGS English School, चे विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सहभाग नोंदविला. त्यांच्या नाविन्यपूर्ण आणि उपयुक्त विज्ञान मॉडेल्सची परीक्षकांनी विशेष दखल घेतली. परीक्षक समितीने विविध निकषांवर मूल्यमापन करून GGS English School, मॉडेलची जिल्हास्तरासाठी निवड केली. याबाब शाळेसह तालुक्यासाठी अभिमानास्पद ठरली आहे. या कार्यक्रमाला शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आज चिवरा येथे वाशिम जिल्हा खो खो निवड चाचणी स्पर्धा


वाशीम परतवाडा येथे १६, १७ व १८ जानेवारी दरम्यान होणाऱ्या विदर्भ राज्यस्तरीय सब ज्युनियर खो खो स्पर्धेत सहभागी होणाऱ्या वाशिम जिल्ह्यातील मुला, मुलीचे खो खो संघ निवडणे करिता शनिवार, १० जानेवार रोजी मालेगाव तालुक्यातील ग्राम चिवरा येथे जिल्हा निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे.

# ठेकेदाराची मुजोरी, अभियंत्याशी हातमिळवणी, गरिबाच्या शेतात पाणी !

## *कोयाळी ते नेतन्सा- डोणगावकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पुलाचे काम चुकीच्या पद्धतीने *प्रधानमंत्री ग्राम सडक नव्हे; भ्रष्टाचार बेधडक

● वसंत खडसे @ वाशीम ●








जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या कोयाळी जाधव ते नेतन्सा, डोणगावकडे जाणाऱ्या प्रधानमंत्री ग्राम सडक योजना भाग - ३ या योजनेतून रस्त्याचे काम करण्यात आले आहे. मात्र सदर कामात अनियमितता आणि ठेकेदाराची मुजोरी व धक्कादायक बाब म्हणजे प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या कामावर संनियंत्रण करणारे अभियंता यांची ठेकेदारांसोबत आर्थिक हातमिळवणी असल्याने कोयाळी येथील एका गरीब शेतकऱ्याच्या शेतात पाणी घुसून प्रचंड नुकसान झाले आहे. चुकीच्या पद्धतीने होत असलेल्या पुलाच्या कामाची चौकशी व कामातील भ्रष्टाचार याची चौकशी व्हावी अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या कामात बेजबाबदार ठेकेदारांकडून काम निकृष्ट दर्जाचे करणे आणि नियमांचे पालन न करता स्वार्थासाठी नियमबाह्य कामे करणे ही आता नित्याचीच बोंब होऊन बसली आहे. मात्र याबाबत वारंवार तक्रारी दाखल होऊनही सबंधित प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कुठलीही दखल न घेणे ही सर्वात मोठी आश्चर्यकारक बाब ठरत आहे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेसारख्या महत्वाच्या योजनेत ठेकेदाराच्या मनमानीमुळे कोयाळी जाधव येथील एका गरीब शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान झाले असल्याची माहिती हाती आली आहे. कोयाळीकडून नेतन्सा डोणगावकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पुलाचे काम चुकीच्या पद्धतीने होत असल्याचा आरोप सबंधित शेतकऱ्याने केला आहे. प्रस्तावित पूल व आराखड्यातील रस्ता विसंगत असल्याचे बोलले जात आहे. परिणामी कोयाळी जाधव येथील एका अल्पभूधारक शेतकऱ्याचे कधीही भरून न निघणारे नुकसान होत असल्याची धक्कादायक माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे प्रधानमंत्री ग्राम सडक योजना नव्हे; ही तर भ्रष्टाचार बेधडक योजना असल्याचे कोयाळी येथील नागरिक अपरोधाने बोलत आहेत. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना ही भारत सरकारची एक महत्वाची योजना आहे. ग्रामीण भागातील सर्व वाडी - वस्त्यांना बारमाही जोडल्या जावे या स्तुत्य हेतूने या योजनेसाठी केंद्र सरकार करोडो रुपयांचा निधी खर्ची घालत आहे. जेणेकरून ग्रामीण भागाचा सामाजिक, आर्थिक विकास होईल व आरोग्य, शिक्षण आदि सोईसुविधा सहज उपलब्ध होण्यासाठी लहान, मोठ्या वाडी -वस्त्या मुख्य बाजारपेठांशी जोडल्या जाव्यात या हेतूने सदर योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. मात्र सदर योजनेचे संनियंत्रण करणारी यंत्रणाच कुचकामी ठरत असल्याने ठेकेदारांचा मनमानी कारभार सुरू असल्याचा आरोप सामान्य नागरिक करत आहेत. विशेष बाब म्हणजे या गंभीर बाबीकडे स्थानिक लोकप्रतिनिधी जाणीवपूर्वक कानाडोळा करत असल्याने कुठेतरी पाणी मुरत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. कोयाळी जाधव नजीकच्या पुलाच्या कामाने या योजनेतील भ्रष्टाचाराचे पितळ उघडे पडत असून कामातील अनियमिततेचे वास्तव उजागर होत आहे. या गंभीर प्रकाराची वरिष्ठांकडून चौकशी व्हावी व एका गरीब शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना न्याय द्यावा अशी मागणी होत आहे.

## घरकुल लाभार्थी निधीच्या प्रतिक्षेत !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



प्रधानमंत्री घरकुल आवास योजना अंतर्गत तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करण्यात आले आहे. मात्र ऐन वेळेवरच घरकुलाचे हप्ते मिळत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. अनेक गोरगरीब घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांनी कर्ज काढून घरकुलाच्या जोत्याचे बांधकाम पूर्ण केले आहे. जिओ टॅगिंग होऊनही जवळपास दोन ते तीन महिन्याचा कालावधी उलटूनही अद्यापही दुसरा व तिसरा हप्ता शासनाकडून प्राप्त न झाल्याने अनेकांचे बांधकाम रखडले आहेत. केवळ पहिला हप्ता १५००० रुपयाचा तालुक्यातील लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आला आहे. मात्र उर्वरित दुसरा व तिसरा हप्ता मिळत नसल्याने अनेक लाभार्थी निधीच्या प्रतिक्षेत आहेत. या घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांचे पक्क्या घरांचे स्वप्न आता पूर्ण होणार किंवा नाही असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. तालुक्यातील आमदार, खासदार यांनी तात्काळ घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली जात आहे.

## वाशीमच्या रेल्वे स्टेशन परिसरात...

# अज्ञात महिलेची निर्घृण हत्या!

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●





### लैंगिक अत्याचार करत हत्या झाल्याची शक्यता, पोलीस तपास सुरू

वाशीमच्या रेल्वे स्टेशन परिसरात एका अज्ञात महिलेच्या डोक्यावर दगड घालून निर्घृण हत्या केल्याची घटना समोर आली आहे. ही हत्या महिलेवर लैंगिक अत्याचार करत झाल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाली असून तपास सुरू करण्यात आलं आहे. मात्र या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.

दि. ०९ जानेवारी शुक्रवार रोजी वाशिमच्या रेल्वे स्टेशन परिसरात ४५ ते ५० वर्षीय एका अज्ञात महिलेची दगडाने ठेचून निर्घृणपणे हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तसेच या मृत महिलेवर लैंगिक अत्याचार झाल्याची शक्यता देखील वर्तवली जात आहे. मृत महिलेचे पुरावे मिळू नये यासाठी आरोपीकडून महिलेची दगडाने ठेचून हत्या केल्याचा दिसून येत आहे. घटनास्थळी हत्येसाठी वापरलेला दगड, दारूच्या बाटल्या मिळून आल्या आहेत. मृत महिलेच्या हातावर छाया मोहन असे नाव असून ती महिला बाहेर जिल्ह्यातील असल्याची प्राथमिक माहिती आहे.

घटनेची माहिती मिळताच वाशिम शहर पोलीस, स्थानिक गुन्हे शाखा आणि श्वान पथक घटना स्थळी दाखल झाले असून पंचनामा करत मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. पुढील तपास सुरू करण्यात आलं आहे. रेल्वे स्टेशन सारख्या वर्दळीच्या ठिकाण या महिलेची हत्या झाल्याने प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न देखील निर्माण झाला आहे. मात्र पोलीस आता या हत्येचा उलगडा कसा करणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जि.प.पं.स साठी बाशिंग बांधून बसले, जयंतीवरून राजकारण करू लागले...

# झोपलेले निवडणुकीने उठवले, आता महापुरूष आठवले !

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●




केनवड जिल्हा परिषद सर्कलमध्ये सध्या एक वेगळीच चर्चा रंगत आहे. वर्षभर आपल्याच कामात व्यस्त व शांत असलेले पुढारी आता अचानक मोबाईल व्हॉट्सअॅप ग्रुपवर जयंती-पुण्यतिथींचे बॅनर तयार करून त्या बॅनर खाली जिल्हा परिषद सर्कल केनवड अशी म्हण टाकून शुभेच्छांचे संदेश फिरवू लागले आहेत.

केनवड सर्कलमधील अनेक व्हॉट्सअॅप ग्रुपवर एकामागोमाग एक फोटो, संदेश आणि बॅनरचा पूर दिसत असून, 'इतके दिवस हे पुढारी कुठे होते, झोपले ?' अशी चर्चा परिसरात सुरू आहे. वर्षभर गावातील पाणी, घरकुल, रोजगार, रस्ते, आरोग्य, शिष्यवृत्ती अशा ज्वलंत प्रश्नांवर हेच पुढारी आपल्याच कामात गुंतलेले होते. ना संदेश, ना विचारपूस, ना संवाद. मात्र निवडणुकीची चाहूल लागताच महापुरुषांची जयंती अचानक आठवू लागली आणि मोबाईल ग्रुप हेच जणू राजकारणाचे मुख्य माध्यम बनले आहे. आज ज्या महापुरुषांचे फोटो आणि विचार मोबाईलवर झळकत आहेत, त्यांच्या नावाने वर्षभर एकही ठोस सामाजिक उपक्रम, मदतकार्य किंवा प्रश्नांसाठी ठाम आवाज ऐकू आला नाही-ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे नागरिक थेट सवाल उपस्थित करत आहेत, 'जयंती ही भावना आहे की फक्त पोस्ट?' शेतकऱ्यांवर किंवा गावकऱ्यांवर संकट आले, पाणीटंचाई, नुकसान, आजारपण किंवा तातडीचा प्रश्न उभा राहिला तर हेच पुढारी परिसरात आहेत की नाहीत, याचाही पत्ता लागत नाही, अशी ग्रामस्थांची तक्रार आहे. संकटाच्या वेळी गायब आणि निवडणूक जवळ येताच सक्रिय-हा दुटप्पीपणा आता सर्वसामान्यांच्या लक्षात येऊ लागला आहे. निवडणूक नसताना वैयक्तिक कामे, राजकीय गणिते आणि सोयीसुविधांत गुंतलेले दिसणारे पुढारी, निवडणूक जवळ आली की मोबाईलवर अचानक हजर होऊन जनतेशी जवळीक दाखवण्याचा प्रयत्न करतात-हीच गोष्ट केनवड सर्कलमधील नागरिकांना खटकत आहे. महापुरुषांची आठवण वर्षभर असावी, जयंतीपुरती नव्हे. शुभेच्छा पोस्टपेक्षा प्रत्यक्ष काम, उपस्थिती आणि सातत्य महत्त्वाचे-असा ठाम सूर गावकऱ्यांचा आहे. सध्या एकच चर्चा आहे- 'निवडणूक आली की मोबाईल जागा होतात, पण प्रश्न आले की सगळे ऑफलाइन!' होतात. भाईसाहब ये जनता है सब कुछ जानती है.

#### वाशिममध्ये 'वृक्ष वाचवा, उड्डाणपूल उभारा' मोहीम जोरात...

## व्हा दक्ष, विकासाकडे द्या लक्ष, वाचवा वृक्ष !

**रुंदीकरणासाठी झाडांची कत्तल नको; सामाजिक कार्यकर्ता कृष्णा चौधरी यांचा पुढाकार**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



शहराचा विकास होत असताना पर्यावरणाचा बळी दिला जाऊ नये, या मागणीसाठी वाशिममध्ये आता नागरिक एकवटले आहेत. अकोला नाका ते हिंगोली नाका या दरम्यान होणाऱ्या रस्ते रुंदीकरणात अनेक जुनी झाडे तोडली जाण्याची शक्यता आहे. याला कडाडून विरोध करत, 'आम्हाला रुंदीकरण नको, तर उड्डाणपूल हवा' अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता कृष्णा चौधरी यांनी केली आहे.

मोहिमेचे मुख्य मुद्दे: निसर्गाचे रक्षण: उड्डाणपूल झाल्यास झाडे न तोडता वाहतुकीची कोंडी सुटेल आणि निसर्गाचा आस्वादही घेता येईल. शाश्वत विकास: रुंदीकरणापेक्षा उड्डाणपूल हा भविष्यातील वाढती वाहतूक पाहता जास्त सोयीस्कर ठरेल. लोकसहभाग: या संदर्भात १३ जानेवारी रोजी प्रशासनाकडे अधिकृत आक्षेप नोंदवण्यात येणार आहेत. 'विकास हा झालाच पाहिजे, पण तो झाडे तोडून नको. उड्डाणपूल केल्यास रस्ताही मोकळा होईल आणि वाशिमचे वैभव असलेली झाडेही वाचतील. गरज पडल्यास आम्ही न्यायालयाचे दरवाजेही ठोठावू.' असा इशाराही सामाजिक कार्यकर्ते कृष्णा चौधरी यांनी दिला आहे. विकासाच्या नावाखाली वाशीम शहर भकास करीत आहेत. रस्ता चौपदरी ऐवजी दुपदरी होत आहे. आता रस्त्यावरील वृक्ष तोड करून पुन्हा शहर भकास करण्याचा डाव आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शनिवार, दि.१०जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# सागर भारुका यांना समाजसेवेचा वसा अन् विकासाचा ध्यास!

- प्रभाग 12 (ड) मध्ये शिवसेना उमेदवार सागर भारुकांचा झंझावात
- पथनाट्यांद्वारे अतिशय वेगळ्या प्रकारे सुरु झाला सागर भारुकांचा प्रचार

# अकोला मनपा निवडणूक; प्रभाग 14 मध्ये महायुतीचा एल्गार

- प्रविणभाऊ जगताप यांच्या नेतृत्वात भाजप-राष्ट्रवादीचे पॅनेल प्रचारात सुसाट
- देशात, राज्यात आणि महापालिकेत सत्ता आणण्यासाठी जनतेचा हातभार

प्रतिनिधी १० जानेवारी



**अकोला:** शिवनी, मलकापूर या प्रभाग क्रमांक १४ मध्ये राजकीय वातावरण प्रचंड तापले आहे. भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस (युती) च्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या अधिकृत उमेदवारांनी प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. या प्रभागात प्रविणभाऊ जगताप यांच्या २५ वर्षांच्या सामाजिक कार्याचा वारसा आणि भाजप-सरकारच्या विकासकामांच्या जोरावर महायुतीचे पॅनेल मतदारांपुढे जात आहे.

या प्रभागातून चारही जागांवर भाजपने आपले तगडे उमेदवार रिंगणात उतरवले आहेत: दिपाली प्रविण जगताप, अस्मिता राजेश वगारे, गोपाल रघुनाथ मुळे, दिलीप तुळशीराम भरणे यांना सामान्य जनतेतून मोठा प्रतिसाद मिळत आहे. प्रविणभाऊ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या २५ वर्षांपासून या भागात विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. शिवनी-मलकापूर परिसरात झालेला विकास हा केवळ योजनांचा परिणाम नसून, तो नागरिकांच्या विश्वासाचा आणि भाजप सरकारच्या सक्षम पाठपुराव्याचा विजय असल्याचे जाहिरातीत नमूद करण्यात आले आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, शिक्षण आणि कचरा व्यवस्थापन यांसारख्या मूलभूत सुविधांचे जाळे या भागात भक्कमपणे विणण्यात आले आहे. या पॅनेलला खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीरभाऊ सावरकर, अमोल मिटकरी, विजय अग्रवाल, विजयभाऊ देशमुख आणि स्थानिक नेत्यांचा भक्कम पाठिंबा आहे. या नेत्यांनी दाखवलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी उमेदवार आणि कार्यकर्ते अहोरात्र मेहनत घेत आहेत. प्रचारादरम्यान उमेदवारांनी 'कमळ' या चिन्हासमोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले आहे. 'प्रभागाचा विकास हाच आमचा एकमेव अजेंडा आहे,' असे दिलीप भरणे आणि गोपाल मुळे यांनी म्हटले आहे. तर महिला उमेदवारांनी प्रामुख्याने प्रभागातील आरोग्य आणि सुरक्षेच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करण्याचे आश्वासन दिले आहे. प्रभाग १४ मध्ये भाजपने शिस्तबद्ध नियोजन आणि विकासकामांचा लेखाजोखा मांडल्यामुळे विरोधकांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. प्रविणभाऊ जगताप यांचा दांडगा जनसंपर्क भाजपच्या या 'चारही' उमेदवारांच्या विजयासाठी मैलाचा दगड ठरणार असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.



प्रतिनिधी १० जानेवारी

**अकोला:** जनसेवेचा वसा घेतलेले नेतृत्वच जनतेच्या गळ्यातील ताईत बनते. अकोल्याच्या राजकारणात सध्या अशाच एका नेतृत्वाची चर्चा जोरात सुरू आहे, ते म्हणजे सागर भारुका. नगरसेवक नसतानाही केवळ जनसेवेच्या भावनेतून प्रभाग ११ मध्ये विकासाचा डोंगर उभा केल्यानंतर, आता भारुका प्रभाग १२ (ड) मधून शिवसेनेचे (मशाल चिन्ह) उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात उतरले आहेत. त्यांच्या कार्याचा धडाका पाहून याही प्रभागात विकासाची गंगा वाहणार, असा विश्वास स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे.

सागर भारुका यांनी प्रभाग ११ मध्ये आपल्या अष्टपैलू कार्यातून विकासाचा नवा पॅटर्न सेट केला आहे. पाणीटंचाई दूर करण्यासाठी त्यांनी स्वखर्चाने व पाठपुराव्याने ३२ ते ३५ सबमर्सिबल पंप बसवून नागरिकांना दिलासा दिला. केवळ भौतिक विकासच नाही, तर सामाजिक बांधिलकी म्हणून दरवर्षी रक्तदान शिबिर, मोफत नेत्र तपासणी आणि आरोग्य शिबिरांचे आयोजन करून त्यांनी शेकडो गरजूंचे प्राण वाचवले आहेत. दरवर्षी भजन, जम्मा जागरण आणि श्रावण महिन्यात कावडधारकांसाठी नाश्ता व पाण्याची सोय करून त्यांनी धार्मिक परंपरा जपली आहे. स्थानिक खेळाडूंना व्यासपीठ मिळावे यासाठी भव्य क्रिकेट टूर्नामेंटचे आयोजन.गणेशोत्सवात 'गणेश मूर्ती सजावट स्पर्धा' घेऊन सांस्कृतिक चेतना जागृत केली. सागर भारुकांचा प्रचार इतर उमेदवारांपेक्षा वेगळा ठरत आहे. त्यांची टीम पथनाट्याद्वारे नागरिकांशी संवाद साधत आहे. केवळ मते न मागता, प्रभागातील समस्या प्रत्यक्ष जाणून घेतल्या जात आहेत. विशेष म्हणजे, ज्या समस्या तात्काळ सुटण्यासारख्या आहेत, त्या जागेवरच सोडवण्यावर भारुका भर देत आहेत. राधा किसन प्लॉट परिसरातील कचऱ्याचा प्रश्न आणि महाकाली माता परिसर विकासाचे काम सागर भैयांच्या पुढाकारामुळे पूर्ण झाले असून, नागरिकांनी त्यांचे आभार मानले आहेत.

## विकासाची गती कायम ठेवण्यासाठी भाजप उमेदवारांना विजयी करा-अर्चना शर्मा

प्रतिनिधी १० जानेवारी



**अकोला:** महानगरातील प्रत्येकाला सर्वोत्तम नागरी सुविधा मिळाव्यात. अकोल्याला स्थीर नेतृत्व, पारदर्शक कारभार आणि विकासाची गती कायम ठेवायची आहे यासाठी भारतीय जनता पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना विजयी करा असे आवाहन भाजपा महिला आघाडीच्या नेत्या अर्चनाताई शर्मा यांनी केले.

ड्रेनेज, पाणीपुरवठा, उद्याने, आरोग्य, शिक्षण क्षेत्रात दर्जेदार कामे तसेच अनेक प्रकल्प कागदावर न राहता जमिनीवर आणण्याचं काम करणाऱ्या भारतीय जनता पक्षाचे नेते संजयभाऊ धोत्रे, स्व. गोवर्धन शर्मा, आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, पालकमंत्री आकाश फुंडकर यांच्या नेतृत्वाखाली शहराचा विकासाला गती देण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना विजयी करा असे आवाहन कृष्णा शर्मा यांनी केले.

भारतीय जनता पक्षाचे प्रभाग १० मधील उमेदवार अनिल गरड, नितीन ताकवाले, वैशालीताई शेळके मंजुषाताई शेळके, प्रभाग ६ मधील उमेदवार हर्षद भाबरे, निकिता देशमुख, पवन महाले, आरती घोगलीया, प्रभाग वीस मधील मंगेश जिने, विनोद मापारी, सोनाली अंधारे, शारदाताई ढोरे, गीताताई पावसाळे, माधुरीताई बडोणे, प्रभाग आठ मधील राजेश्वर धोटे, रंजना विंचनकर, माधुरी क्षीरसागर तुषार भिरड. प्रभाग १२ मधील अजय शर्मा, संगीता भरगड, संतोष डोंगरे, कल्पना गोटफोडे, प्रभाग १३ मधील सुनीता अग्रवाल, प्राची काकडे, विशाल इंगळे, अनिल मुरूमकर. प्रभाग सोहळा मधील सिद्धार्थ उपर्वट, मुस्कान पंजवाणी तसेच हरीश आलिमचंदानी, मनीषा भन्साली, शारदा खेडकर, बाळ टाले यांच्या प्रचारार्थ त्यांनी जनसंपर्क अभियान राबवून भारतीय जनता पक्षाला विजयी करण्याचे आवाहन केले.

## प्रभाग 5 मध्ये भाजपचे विजय अग्रवाल यांच्यासह सर्व उमेदवारांना मतदारांचा कौल

प्रतिनिधी १० जानेवारी



**अकोला:** अकोला महानगरपालिका निवडणूक २०२६ च्या रणधुमाळीत प्रभाग क्रमांक ५ मधील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. भारतीय जनता पार्टीने या प्रभागातून अनुभवी आणि जनमानसात पकड असलेल्या चार उमेदवारांची फळी मैदानात उतरवली असून, भाजप निवडणूक प्रमुख विजय अग्रवाल यांच्या सोबत या पॅनेलला मतदारांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. प्रभागातील वाढता जनसंपर्क आणि भाजपच्या अधिकृत उमेदवारांच्या पदयात्रा आणि कॉर्नर सभांमुळे विरोधकांचे धाबे दणाणले आहेत.

भाजपचे प्रभाग ५ मधील अधिकृत उमेदवारांना जनतेकडून वाढता पाठिंबा मिळत आहे

प्रभाग ५ मधून भाजपने सामाजिक समतोल आणि विकासाचा अनुभव लक्षात घेऊन या उमेदवारांना उमेदवारी दिली आहे

खंडारे विद्या सुभाष महिलांच्या समस्या आणि प्रभागातील सामाजिक कार्यात अग्रेसर असणारा चेहरा. जयंत रामराव मसने दांडगा जनसंपर्क आणि विकासकामांचा ध्यास असलेले अनुभवी व्यक्तिमत्व अवचार रश्मी प्रशांत प्रभागातील मूलभूत प्रश्नांची जाण असलेल्या सक्रिय उमेदवार. अग्रवाल विजय कमलकिशोर (अक्र. १): भाजपचे ज्येष्ठ नेते आणि प्रदीर्घ राजकीय अनुभव असलेले नेतृत्व.

विकासाच्या मुद्द्यावर मतदारांचे एकमत झाले आहे

प्रभागातील जनसंपर्क दौऱ्यादरम्यान विजय अग्रवाल यांनी मतदारांशी संवाद साधताना सांगितले की, 'अकोला ही राजराजेश्वर नगरी आहे आणि या नगरीचा विकास करणे हे आमचे परम कर्तव्य आहे. प्रभाग ५ मधील रस्ते, पाणी आणि स्वच्छतेचे प्रश्न प्राधान्याने सोडवण्यासाठी भाजपचे हे संपूर्ण पॅनेल कटिबद्ध आहे.'

## प्रतिबंधित नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्यावर कारवाई

प्रतिनिधी १० जानेवारी

**खामगाव :** प्रतिबंधित व घातक नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या एका युवकास शहर पोलिसांनी गुरुवारी दुपारी मोची गल्ली परिसरातून ताब्यात घेतले. त्याच्याकडून १० रिल नायलॉन मांजा असा सुमारे ६,५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मोची गल्ली भागात बंदी असलेल्या मांजाची विक्री होत असल्याची माहिती खामगाव शहर पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी संबंधित परिसरात छापा टाकला. चेतन मुकेश चव्हाण (२७, रा. मोची गल्ली, खामगाव) हा नायलॉन मांजाची विक्री करताना आढळून आला. त्याच्या ताब्यातून प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या १० रिल जप्त करण्यात आल्या. या प्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२५ तसेच पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अंतर्गत कलम १५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस युतीचे हर्ष चौधरी पाटील रिंगणात



प्रतिनिधी १० जानेवारी

**अकोला:** अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ चा बिगुल वाजला असून, प्रभाग क्र. ९ मधून भारतीय जनता पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून हर्ष बाबुराव चौधरी (पाटील) यांचे नाव समोर आले आहे. युवा नेतृत्व आणि जनसेवेची ओढ असलेले हर्ष चौधरी प्रभाग क्र. ९ (ड) मधून निवडणूक लढवत असून त्यांच्या उमेदवारीमुळे प्रभागातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

हर्ष चौधरी यांनी प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी २४ कलमी जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील मुद्द्यांवर भर देण्यात आला आहे. प्रत्येक गल्लीतील रस्त्यांचे काँक्रीटीकरण आणि भूमिगत गटार व्यवस्थेचे नियोजन करण्यात येईल. प्रभागातील जनतेसाठी २४ तास मोफत रुग्णवाहिका सेवा आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसह वायफाय सुविधा लावणार आहे. महिलांसाठी सुरक्षिततेची हमी, वॉकिंग ट्रॅकची निर्मिती आणि बचत गट शिबिरांचे आयोजन करण्यात येईल. नियमित साफसफाई, फॉगिंग मशीनद्वारे फवारणी आणि उद्यानांचे सौंदर्यीकरण करण्यावर भर देण्यात येईल असे ठोस आश्वासन हर्ष चौधरी पाटील यांनी दिले आहे. 'प्रभागाचा कायापालट करणे आणि सामान्यांच्या समस्या सोडवणे हेच माझे मुख्य ध्येय आहे,' अशी प्रतिक्रिया हर्ष चौधरी पाटील यांनी यावेळी व्यक्त केली.

## मुख्य निवडणूक निरीक्षकांनी केली मतदान केंद्रांसह स्ट्राँग रूमची पाहणी

प्रतिनिधी १० जानेवारी




**अकोला :** अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने ९ जानेवारी रोजी मुख्य निवडणूक निरीक्षक अर्पित चौहान यांच्याव्दारे अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार अकोला महानगरपालिका प्रशासनाव्दारा स्ट्राँग रूम, मतमोजणी केंद्रांची आवश्यक असलेली सर्व सुसज्ज व्यवस्थेबाबत पाहणी करण्यात आली.

यावेळी मुख्य निवडणूक निरीक्षक अर्पित चौहान यांनी झोन क्रं. १ अंतर्गत अकोला जिल्हा मराठा मंडळ, रामदास पेठ, झोन क्रं. २ अंतर्गत शासकीय धन्य गोडाऊन, जिल्हाधिकारी कार्यालय, झोन क्रं. ३ अंतर्गत निमवाडी पोलीस वसाहत येथील मल्टीपर्पज हॉल, झोन क्रं.४ अंतर्गत राजमाता जिजाऊ अभियंता प्रशिक्षण केंद्र रेल्वे स्टेशन जवळ, झोन क्रं. ५ अंतर्गत जिल्हा परिषद कर्मचारी कल्याण भवन, सिव्हील लाईन आणि झोन क्रं. ६ अंतर्गत शासकीय गोडाऊन, खदान यांचेसह मतदान केंद्रांची संख्या जास्त असलेली ईमारत ज्यामध्ये डाबकी रोड येथील मनपा उच्च प्राथमिक शाळा क्रं. १०, आकोट फैल येथील मनपा मराठी मुलांची शाळा क्रं. ६, मनपा हिंदी बालक शाळा क्रं. २, सिंधी कॅम्प येथील सिंधी हिंदी शाळा, मोठी उमरी येथील जि.प.प्राथमिक मराठी केंद्र शाळा क्रं. १ आदी ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करून महानगरपालिका प्रशासनाव्दारा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनंषंगाने केलेल्या सर्व व्यवस्थाबाबत समाधान व्यक्त केले.

## अकोल्यात अज्ञात महिलेचा शोध सुरू

प्रतिनिधी १० जानेवारी

**अकोला :** रामदास पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक अज्ञात महिला हरविल्याची नोंद करण्यात आली आहे. सदर महिला अंदाजे ४५ वर्षे वयाची असून ८ जानेवारी २०२५ रोजी निता गेस्ट हाउस समोर मृतावस्थेत आढळून आली. मात्र तिची ओळख अद्याप पटलेली नाही. महिलेची उंची सुमारे ५ फूट, शरीरयष्टी सडपातळ, रंग सावळा, चेहरा गोल, डोळे लहान मोठे बंद, तसेच केस काळे व लहान आहेत. ती काळ्या रंगाची हुळी, जांभळ्या रंगाचा सलवार व हिरव्या गुलाबी रंगाचा दुपट्टा परिधान केलेली होती. बोलण्याची भाषा स्पष्ट नसल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणी रामदास पेठ पोलीसठाण्यात मिसिंगची नोंद करण्यात आली.

## एमआयएमच्या 'पतंगा'ची दोर कोणाच्या हातात!

### खासदार इम्रान प्रतापगडींचा अकोल्यातून हल्लाबोल

प्रतिनिधी १० जानेवारी




**अकोला:** अकोला महानगरपालिकेच्या रणधुमाळीत काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारासाठी खासदार इम्रान प्रतापगडी यांची जाहीर सभा पार पडली. यावेळी त्यांनी एमआयएम आणि भाजपवर सडकून टीका केली. 'मुस्लिम समाजातील आपसातील लढाईमुळे केवळ समाजाचेच नुकसान होत आहे,' अशी खंत व्यक्त करत त्यांनी अकोल्यात काँग्रेसचा महापौर आणण्याचे आवाहन केले.काँग्रेसचे दिवंगत नेते हिदायत पटेल यांच्या हत्येबद्दल प्रतापगडी यांनी तीव्र शोक व्यक्त केला.

इम्रान प्रतापगडी यांनी एमआयएमच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. अकोट येथील भाजप आणि एमआयएमच्या कथित युतीचा दाखला देत ते म्हणाले, 'एमआयएमच्या पतंगाची दोर प्रत्यक्षात कोणाच्या हातात आहे, हे आता जनतेला समजले आहे.' त्यांनी एमआयएमला भाजपची 'बी टीम' असल्याचे सूचित करत मतदारांना सावध केले.

अकोला महानगरपालिकेच्या कर धोरणावर टीका करताना प्रतापगडी म्हणाले की, 'आज अकोल्यात इंग्रजांच्या काळापेक्षाही जास्त कर वसुली केली जात आहे.' जर अकोला महानगरपालिकेत काँग्रेसची सत्ता आली, तर ही कर वसुली निम्मी करण्याचे महत्त्वाचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.आपल्या भाषणात त्यांनी नेल्सन मंडेला आणि त्यांच्या जेलरचा हृदयस्पर्शी किस्सा सांगितला. समाजातील सज्जनता आणि माणुसकी टिकवून ठेवणे किती गरजेचे आहे, हे त्यांनी या उदाहरणातून पटवून दिले. राजकीय लढाईत नैतिकतेची जोड हवी, असा संदेश त्यांनी कार्यकर्त्यांना दिला. अकोल्यात काँग्रेसने अत्यंत ताकदवान आणि 'पहेलवान' उमेदवार दिले असल्याचे सांगत त्यांनी विजयाची खात्री दिली. तसेच, ज्यांना तिकीट मिळाले नाही, त्यांनीही पक्षाच्या हितासाठी उमेदवारांना साथ द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.जुन्या शहरातील पुलाबाबत एमआयएमने व्हायरल केलेल्या व्हिडिओचा समाचार घेत प्रतापगडी यांनी स्पष्ट केले की, काँग्रेस विकासाच्या आश्वासनांना जागी आहे. आमदार साजीद खान यांनीही यावेळी शहरातील प्रलंबित विकासकामांचे मुद्दे उपस्थित करून भाजपच्या अपयशावर बोट ठेवले.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK